रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३४५
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ३ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

दुचाकी ओहळात कोसळून तरुणीचा मृत्यू/२
रानभाज्यांची आवक वाढली, खवय्यांची पसंती/५
भारत-इंग्लंड सामन्यात 'पावसाची बॅटिंग'/८

## टीईटी पेपरफुटीप्रकरणी आणखी तिघांना अटक




**भिवंडी :** टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणखी तीन आरोपींना अटक करण्यात पोलीस यंत्रणेला यश आले आहे. या प्रकरणात यापूर्वी एका महिलेसह चार जणांना अटक केल्यानंतर गुरुवारी (दि.२) बिहारमधील समस्तीपूर येथून दोन, तर हरयाणातील सोनीपथ येथून एक अशा तीन आरोपींना बेड्या ठोकल्या. सोनूकुमार सिंह (वय ३३), मिथुनकुमार सिंह (वय ३४, दोघेही रा.समस्तीपूर बिहार) आणि कपिल कृष्णा दहिया (वय ४१, रा.सोनीपथ, हरयाणा) अशी अटक करण्यात आलेल्या नव्या आरोपींची नावे आहेत. सोनूकुमार व मिथुनकुमार या दोघांना समस्तीपूर येथून, तर कपिल दहिया यास रात्री १ वाजता हरियाणातील सोनीपथ येथून अटक करण्यात आली आहे. या तिघांनाही भिवंडी न्यायालयात हजर केले असता ९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक विधानसभेत मंजूर

# महाराष्ट्राचे ऐतिहासिक पाऊल!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतमजूर, निराधार महिलांना 'शेतकरी' म्हणून कायदेशीर मान्यता देणारे आणि त्यांच्यासाठी विशेष सवलतींचा वर्षाव करणारे महत्त्वाकांक्षी महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक गुरुवारी (दि.२) विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. या विधेयकाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना प्रथमच स्वतंत्र व कायदेशीर ओळख मिळणार असून असा बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

या विधेयकानुसार १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या आणि शेतीसह शेतीपूरक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व महिलांना कायदेशीर प्रमाणपत्र देऊन 'शेतकरी' म्हणून मान्यता दिली जाईल. यामध्ये पारंपरिक शेती करणाऱ्या महिलांसह शेतमजूर, मासेमारी, पिकांची लागवड, बियाणे उत्पादन, पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधमाशी पालन, चारा लागवड, मत्स्यपालन, रेशीम उत्पादन घेणाऱ्या महिलांचा समावेश असेल. याशिवाय गांडूळ खत उत्पादन, फळबाग, फुलशेती, मशरूम लागवड, कृषी वनीकरण, चराईसाठी किंवा खतासाठी जमिनीचा वापर करणाऱ्या तसेच स्वयंरोजगार, भाडेतत्त्वावरील शेती किंवा वाटणी शेती करणाऱ्या सर्वच कष्टकरी महिलांना या परिघात आणून त्यांना अधिकार दिले जातील.

ग्रामपंचायत आणि नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाल्यानंतर या महिलांना सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांमार्फत शेतकरी प्रमाणपत्र दिले जाईल. या प्रमाणपत्राच्या आधारे महिला शेतकऱ्यांना बँकांकडून पतपुरवठा, बियाणे, खते, कृषी कर्ज, पीक विमा व त्यांचे कृषी उत्पादन थेट बाजारात पोहचवण्यासाठी विशेष अर्थसाह्य व सवलती पुरवल्या जातील. विधान परिषदेच्या मंजुरीनंतर राज्यपालांच्या स्वाक्षरीने या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल.

### स्वतंत्र ओळख मिळणार

महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता, समान हक्क आणि शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळवून देणारे महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक राज्यातील महिलांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय आहे. या विधेयकाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना प्रथमच स्वतंत्र व कायदेशीर ओळख मिळणार असून महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

### विविध आर्थिक लाभ

या विधेयकांतर्गत पात्र महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना शासनाच्या विविध कृषी योजना, अनुदाने, सुलभ बँक कर्ज, पीक विमा, कृषी विस्तार सेवा, बाजारपेठ, शासकीय खरेदी, गोदाम सुविधा तसेच विविध आर्थिक लाभ मिळणार आहेत.

## रायगडात पावसाचा जोर कायम



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी पावसाने शंभरी गाठली. जिल्ह्यात गुरुवारी (दि.२) सकाळी ९ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासांत सरासरी १२२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. आणखी दोन दिवस जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार महाराष्ट्र ते उत्तर केरळ किनारपट्टीदरम्यान कमी दाबाचा पट्टा सक्रिय असून मध्य-ट्रोपोस्फेरिक द्रोणीय रेषा कोकण, मध्य महाराष्ट्र व मराठवाडादरम्यान पसरली आहे. या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकणात काही ठिकाणी अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

या कालावधीत जिल्ह्यातील नद्या, ओढे आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता असून सखल भागात पाणी साचणे, पूरसदृश परिस्थिती निर्माण होणे तसेच घाट परिसरात दरडी कोसळण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा. करायचाच असेल तर रस्त्यांची व वाहतुकीची अद्ययावत माहिती घेऊनच प्रवास करावा तसेच हवामान विभाग, जिल्हा प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचना व इशाऱ्यांचे पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तालुकानिहाय पाऊस (मिलीमीटरमध्ये)

अलिबाग १३६, मुरूड ९०, पेण १२०, पनवेल १९१.४, उरण १०४, कर्जत १५२, माथेरान २०८, खालापूर १२०, रोहा ४८, सुधागड १०२, माणगाव १२३, तळा १३५, महाड ९७, पोलादपूर ६२, श्रीवर्धन १३९, म्हसळा १३८, एकूण पर्जन्यमान १९६५.४, सरासरी १२२.८४.



## आंबेनळी घाटात पुन्हा दरड कोसळली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आंबेनळी घाटात पोलादपूर तालुक्यातील पायटा ते कुंभळवणेदरम्यान दरड कोसळल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी (दि.२) बावळी टोक या ठिकाणी त्याची पुनरावृत्ती झाली. यानंतर यंत्रणांकडून ढिगारा हटविण्याचे काम हाती घेण्यात आले.

दरम्यान, आंबेनळी घाटात दरडी कोसळण्याच्या सलग दोन घटनांनंतर पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी वाहतूकदार आणि प्रवासी वाहनांनी आवश्यक असल्यासच या घाटरस्त्याचा वापर करण्याचे आवाहन केले आहे, मात्र दरडी कोसळण्याच्या घटना सातत्याने होत राहिल्यास गेल्या वर्षीप्रमाणे यंदादेखील घाटरस्ताबंदीची अधिसूचना जारी होण्याची शक्यता आहे.

## माहिती अधिकार कायद्यातील बदलांच्या प्रस्तावाला स्थगिती

**मुंबई : प्रतिनिधी**

माहिती अधिकार कायद्यामध्ये बदल सुचवणाऱ्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखेर स्थगिती दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र पाठवून स्थगितीचे आदेश दिले आहेत.

प्रशासकीय कारभारावर वचक ठेवणारा हा कायदा २००५मध्ये देशात पहिल्यांदा महाराष्ट्राच्या पुढाकाराने लागू झाला होता. प्रस्तावित बदलांमुळे नागरिकांना माहिती मिळवण्यासाठी अडथळ्यांची शर्यत पार करावी लागणार होती. या कायद्यात सुचवण्यात आलेले बदल हे अत्यंत जाचक आणि सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणारे असल्याचा आरोप होत होता.

यासंदर्भात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले होते. यानंतर मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र पाठवून स्थगितीचे आदेश दिले असून सविस्तर चर्चेशिवाय कोणताही बदल करू नये, असे स्पष्ट केले आहे.

## आपत्कालीन यंत्रणेचा मंत्री महाजनांकडून आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून अनेक ठिकाणी नद्या, नाले भरून वाहत आहेत. या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाला भेट देऊन पाहणी केली आणि अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधत शासकीय यंत्रणेस सतर्कतेच्या सूचना दिल्या.

यंदाच्या पावसाळ्यात संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि सर्व जिल्ह्यांतील आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या आहेत. आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आले आहेत. यासंदर्भात माहिती देताना मंत्री महाजन म्हणाले की, भारतीय हवामान विभागाने ३ आणि ५ जुलै रोजी राज्यातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे तसेच प्रशासनाने केलेल्या सूचनांचे पालन करावे.

नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत संपर्कासाठी राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाचे २४७ हेल्पलाइन क्रमांक १०७०, ०९३२१५८७१४३, ०२२-२२०२७९९०, ०२२-२२७९४२२९ असून जिल्हास्तरीय संपर्क क्रमांक १०७७ आहे.

## निवडक

### दिल्लीत हल्ल्याचा कट रचणाऱ्या चार दहशतवाद्यांना अटक

**नवी दिल्ली :** पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआयच्या इशाऱ्यावर दिल्ली-एनसीआरमध्ये दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा कट रचणाऱ्या चार आरोपींना दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने अटक केली आहे. आरोपींपैकी तिघांना पंजाबमधून, तर एकाला दिल्लीतून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून दोन परदेशी पिस्तुले, नऊ जिवंत काडतुसे आणि पाच मोबाइल जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी अधिक तपास केला जात आहे.

### मुंबईत मॅनहोलमध्ये पडून एकाचा मृत्यू; अधिकारी निलंबित

**मुंबई :** पावसादरम्यान साकीनाका परिसरात खैराणी रोडवरील उघड्या मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.२) दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. मोबाइलवर बोलत चाललेले ६० वर्षीय अस्लम शेख थेट मॅनहोलमध्ये पडले. अग्निशमन दलाने मृतदेह बाहेर काढला. दरम्यान, याप्रकरणी बीएमसीच्या सहाय्यक आयुक्तांसह चार अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

## नवी मुंबईत गर्भवतीचा बाळासह मृत्यू; स्त्रीरोगतज्ज्ञाचे निलंबन

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली माता बाल रुग्णालयात आठ महिन्यांची गर्भवती महिला व तिच्या बाळाचा इंजेक्शन दिल्यानंतर मृत्यू झाला. याची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्तांनी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भावना पगारे यांचे निलंबन केले आहे.

सोनम डोंगरे असे मयत गर्भवती महिलेचे नाव असून ती ३० जून रोजी ऐरोली येथील नवी मुंबई महापालिकेच्या राजमाता जिजाऊ रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झाली होती. तिच्यासोबत आणखी एक गर्भवती महिला होती. या दोन्ही महिला आठ महिन्यांच्या गर्भवती असल्याने त्यांना इंजेक्शन देण्यात आले, मात्र त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने वाशी येथील नमुंमपा सार्वजनिक रुग्णालयात १ जुलै रोजी शिफ्ट करण्यात आले. यातील सोनम डोंगरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

यानंतर मयत सोनम डोंगरे यांच्या संतप्त नातेवाइकांनी महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी केली. आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी तातडीने स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भावना पगारे यांचे निलंबन केले आहे.

दरम्यान, या अनुषंगाने महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये संबंधित इंजेक्शनचे डोस तत्काळ थांबविण्याचे निर्देश आयुक्त डॉ. शिंदे यांच्या सूचनेनुसार देण्यात आले असून इंजेक्शन्सची तपासणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आयुक्तांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती नेमली आहे. यामध्ये जे. जे. रुग्णालयाचे विभागप्रमुख, नवी मुंबई स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ सोसायटीचे सदस्य आणि नमुंमपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे सदस्य असणार आहेत. ही समिती या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असून अहवाल सादर करणार आहे.





## लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलचे आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेत सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रंगोत्सव संस्थेतर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कला स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी सुयश संपादन केले आहे. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचा गुणगौरव केला.

देशभरातील सुमारे पाच ते सात हजार शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता, ज्यामधून केवळ १०० विद्यार्थ्यांची प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकासाठी निवड करण्यात आली. या अत्यंत अटीतटीच्या स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींनी ए प्लस प्लस श्रेणीसह अव्वल स्थान पटकावून आंतरराष्ट्रीय स्तरावर शाळेचे नाव उंचावले आहे.

रंगकाम या उपविभागात इयत्ता नववीतील विद्यार्थिनी श्रेया संजय चव्हाण हिने प्रथम क्रमांक पटकावून जिओ लॅपटॉप व चषक मिळवला, तर पाचवीची विद्यार्थिनी आराध्या जगदीश पाटील हिनेही प्रथम क्रमांक मिळवत मिनी प्रोजेक्टर व चषक पटकावला. या दोन्ही यशस्वी विद्यार्थिनींना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस प्रदान करून गौरविण्यात आले.

विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर, प्रियांका बांगर आदी उपस्थित होते.

## देहरंग धरण झाले ओव्हरफ्लो!

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल शहरासाठी महत्त्वाचा जलस्रोत असलेल्या अप्पासाहेब वेदक (देहरंग) धरणाच्या सांडव्यावरून गुरुवारी (दि.२) पहाटेपासून पाणी वाहू लागले. गेल्या काही महिन्यांपासून धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठल्याने निर्माण झालेली पाणीटंचाईची चिंता यामुळे काही प्रमाणात कमी झाली आहे. समाधानकारक पावसामुळे धरण भरू लागल्याने पनवेलकरांना दिलासा मिळाला आहे.

देहरंग धरणाची पाणीसाठा क्षमता ३.५७ दशलक्ष घनमीटर आहे. पनवेलमधील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी या धरणाचा उपयोग केला जातो, मात्र वाढत्या लोकसंख्येमुळे धरणातील पाणीसाठा अपुरा पडू लागल्याने येथील महापालिकेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्याकडून अतिरिक्त पाणी घ्यावे लागत आहे. अशातच मागील महिनाभर धरणातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने धरणक्षेत्र कोरडे पडले. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना महापालिकेला विशेष उपाययोजना कराव्या लागल्या होत्या.

सध्या धरणात असलेल्या पाण्यामध्ये मातीच्या गाळाचे प्रमाण अधिक असल्याने सांडव्यावरील दरवाजे बंद करण्यात आलेले नाहीत. गाळयुक्त पाणी वाहून जाऊन स्वच्छ पाणी धरणात साठावे असे महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. आणखी समाधानकारक पाऊस झाल्यानंतर धरणात पाणीसाठा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

### पनवेलकरांची पाणी चिंता मिटली

मे महिन्यात धरणातील अपुरा पाणीसाठा आणि एल निनोच्या प्रभावामुळे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पनवेल महापालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन केले होते. आता धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागल्याने शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

## हिंगोलीमध्ये जमिनीतून गूढ आवाज अन् हादरे!

**हिंगोली : प्रतिनिधी**

हिंगोली जिल्ह्यात गेल्या काही काळापासून सुरू असलेले भूकंपाचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. जिल्ह्यातील औंढा नागनाथ आणि आसपासच्या परिसराला गुरुवारी (दि.२) सकाळी भूकंपाचा आणखी एक सौम्य धक्का बसला. सुदैवाने या भूकंपाची तीव्रता कमी असल्याने कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाली नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे, पण वारंवार होणाऱ्या या भूगर्भीय हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार सकाळी १० वाजून १४ मिनिटांनी हा भूकंपाचा धक्का जाणवला. भूमापक केंद्रात या भूकंपाची तीव्रता ३.५ रिक्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील लोहरा गाव हे या भूकंपाचे मुख्य केंद्र होते. लोहरा गावासोबतच शेजारील पिंपळदरी गावालाही हा धक्का प्रकर्षाने जाणवला.

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, औंढा आणि वसमत या तीन तालुक्यांमधील अनेक गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवारी रात्रीही या भागात भूकंपाचे सौम्य धक्के बसले होते. त्यानंतर गुरुवारी सकाळी पुन्हा एकदा जमिनीतून गूढ आवाज येत धक्का बसल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे आणि भीतीचे वातावरण पसरले आहे.

## साचलेल्या पाण्यात करंट लागून तरुणीचा मृत्यू

**मुंब्रा :** येथे साचलेल्या पाण्यात करंट लागून तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आलिया मोहम्मद साजिद चांदीवाला (१७) असे मयत तरुणीचे नाव आहे. मुंब्र्यातील कादर पॅलेस परिसरातील यास्मिन पार्क इमारतीबाहेर बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास आलिया ही काही कामानिमित्त इमारतीबाहेर पडली होती. मुसळधार पावसामुळे साचलेल्या पाण्यात वीजप्रवाह उतरल्याने तिला करंट लागला आणि रुग्णालयात नेण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला असून पुढील तपास सुरू आहे.

**मुंबई ३.० अधिसुचित क्षेत्रातील**
**जमिन विकणे आहे**

मौजे डोलघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुंबई ३.० अधिसुचित क्षेत्रातील (कर्नाळा-साई-चिरनेर अधिसुचित क्षेत्र ) मध्ये समाविष्ठ असलेली ७ एकर जमिन विकणेची आहे. सदर जमिनीचा दर प्रति गुंठा रक्कम रु. ६,००,०००/- (सहा लाख मात्र) आहे.

अधिक माहितीसाठी संपर्कः
**श्री. रिझवान दळवी (मो.नं. ९९६०५३५५४३)**

# 'एसटी'च्या तीर्थाटन योजनेत खासगी भागीदारीला हिरवा कंदील!

## राज्यभर सहा प्रादेशिक पर्यटन संस्थांची होणार निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महत्त्वाकांक्षी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे एसटी संगे तीर्थाटन' योजनेला अधिक व्यापक आणि व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी खासगी पर्यटन संस्थांच्या सहभागाला तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो भाविकांना सुरक्षित, सुसूत्र, किफायतशीर आणि सर्वसमावेशक तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध होणार असून, एसटी महामंडळालाही अतिरिक्त महसुलाचा नवा स्रोत निर्माण होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.




मंत्री सरनाईक म्हणाले की, नव्या धोरणानुसार तीर्थाटन,व धार्मिक सहलींचे नियोजन, निवास, भोजन, स्थानिक पर्यटन, मार्गदर्शक, टोल, पार्किंग, प्रवेश शुल्क आदी सर्व पूरक सुविधा खासगी पर्यटन संस्थांकडून पुरविण्यात येतील. मात्र, बस सेवा, प्रवासी वाहतूक आणि प्रवासभाड्याचे संपूर्ण उत्पन्न एसटी महामंडळाकडेच राहणार आहे. त्यामुळे भाविकांना सर्व सुविधा 'वन-स्टॉप' पद्धतीने उपलब्ध होतील आणि एसटीच्या उत्पन्नालाही चालना मिळेल.

या योजनेअंतर्गत बस आरक्षणासाठी प्रत्येक बसमध्ये बसच्या आसनक्षमतेनुसार प्रवासी असणे बंधनकारक राहील. शासनाच्या विविध सामाजिक घटकांना लागू असलेल्या प्रवास सवलती या योजनेतही लागू राहतील. त्यामुळे खासगी पर्यटन संस्थांच्या तुलनेत या योजनेतील प्रवास खर्च तुलनेने कमी असेल. निवास, भोजन, पिण्याचे पाणी, चहा-नाश्ता, पर्यटनस्थळांचे प्रवेश शुल्क, मार्गदर्शक, पार्किंग, टोल आदी सुविधा वाजवी दरात आणि दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित खासगी संस्थांची राहील. तसेच या सुविधांमधून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी किमान १० टक्के हिस्सा एसटी महामंडळाला देणे त्यांच्यासाठी बंधनकारक असेल.

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे एसटी संगे तीर्थाटन' योजना ही राज्यातील मराठी तरुण-तरुणींसाठी रोजगार आणि उद्योजकतेचे नवे दालन खुलं करणारी योजना आहे. कोणतीही मोठी भांडवली गुंतवणूक न करता, केवळ नियोजन, व्यवस्थापन कौशल्य आणि पर्यटना विषयीची आवड यांच्या जोरावर या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करता येऊ शकते. महाराष्ट्राच्या समृद्ध धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन वारशाला चालना देतानाच स्थानिक युवक-युवतींना स्वावलंबी बनण्याची ही मोठी संधी आहे. राज्यातील अधिकाधिक मराठी तरुण-तरुणींनी या योजनेत सहभागी होऊन पर्यटन उद्योगात आपले स्थान निर्माण करावे, रोजगार निर्मितीत योगदान द्यावे आणि महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाचे भागीदार व्हावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निविदा (RFP) प्रक्रियेद्वारे राज्यातील सहा प्रदेशांसाठी प्रत्येकी एका पर्यटन संस्थेची, अशा एकूण सहा संस्थांची निवड करण्यात येणार आहे. संबंधित संस्थांना पर्यटन क्षेत्रातील अनुभव, शासनमान्य नोंदणी तसेच आवश्यक पात्रता असणे अनिवार्य राहील.

प्रारंभी हा प्रकल्प दोन वर्षे प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार असून, त्यानंतर मिळणाऱ्या प्रतिसादाच्या आधारे पुढील विस्ताराचा निर्णय घेतला जाईल. तीर्थाटन योजनेच्या प्रसिद्धीसाठी खासगी पर्यटन संस्थांना एसटीचा अधिकृत लोगो वापरण्याची मुभा देण्यात येणार आहे.

# माणगाव नगरपंचायतीचे स्वच्छता, पथदिव्यांकडे दुर्लक्ष; नागरिकांमध्ये नाराजी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील रस्ते, स्वच्छता, पथदिवे, वृक्षसंवर्धन, गटार व्यवस्था आणि कालव्याच्या स्वच्छतेसह विविध नागरी समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असून नगरपंचायतीच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

स्वच्छतेबाबतही नगरपंचायतीचा दुहेरी निकष दिसून येत असल्याची टीका होत आहे. 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत शासकिय निधीतून जनजागृतीचे रोषणाईयुक्त फलक उभारण्यात आले असले तरी त्याच फलकांच्या पायथ्याशी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत असल्याने स्वच्छता अभियानाचा उद्देशच प्रश्नचिन्हाखाली आला आहे.

शहरातील अनेक जुनी सावलीची झाडे विकासकामांच्या नावाखाली तोडण्यात आली. नगरपंचायत स्थापन झाल्यापासून वृक्षारोपणाचे अनेक कार्यक्रम राबविण्यात आले असले तरी शहर अपेक्षेप्रमाणे हिरवेगार झालेले दिसत नाही. नागरिकांकडून 'वृक्षकर' आकारला जात असताना झाडांचे नियमित सर्वेक्षण किंवा संरक्षण होत नसल्याचीही खंत व्यक्त होत आहे.

पाणीपुरवठा, गटार व्यवस्था आणि काळ नदी व कालव्याच्या प्रदूषणाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. शहराच्या मध्यभागातून जाणारा कालवा अस्वच्छतेमुळे गटाराचे स्वरूप धारण करत असून त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कालवा पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असल्याचे कारण देत नगरपंचायत जबाबदारी झटकत असल्याची टीकाही होत आहे.

शहरातील गटार बांधकामांच्या दर्जाबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत असून विकासकामांवर खर्च होणाऱ्या निधीचा योग्य वापर होत आहे का, याबाबत नागरिकांनी शंका व्यक्त केली आहे. नगरपंचायतीने रस्ते, पथदिवे, स्वच्छता, वृक्षसंवर्धन, कालव्याची स्वच्छता आणि गटार व्यवस्थेवर तातडीने प्रभावी उपाययोजना करून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांच्या महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित,अलिबाग यांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा हॉटेल वेव्हज, अलिबाग येथे उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेला जिल्ह्यातील ३१ सहकारी पतसंस्थांचे ५४ प्रतिनिधी उपस्थित होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील होते. यावेळी उपाध्यक्ष दिलीप जोशी, सचिव योगेश मगर, संचालक मंडळाचे सदस्य तसेच विविध पतसंस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेमध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, लेखापरीक्षण अहवाल व विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. महासंघाच्या सभासद संस्थांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच सभासदांना भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले.

अंशदानाच्या विषयावर मार्गदर्शन करताना अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांनी संबंधित प्रकरणाचा न्यायालयीन निकाल लागेपर्यंत अंशदान न भरण्याचा सल्ला संस्थांना दिला.यावेळी रायगड जिल्हा पतसंस्थांचा महासंघ व राज्य सहकारी बोर्डाच्या वतीने दि. २३ व २४ जुलै रोजी जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग येथे दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. जिल्ह्यातील सर्व सहकारी पतसंस्थांनी या प्रशिक्षण शिबिरात जास्तीत जास्त प्रतिनिधींना सहभागी करून सहकार क्षेत्रातील अद्ययावत माहिती व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले.

# पाच्छापूरजवळ एसटी कलंडली; सर्व ४२ प्रवासी सुखरूप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर रस्त्याची झालेली दुरवस्था किती भयानक आहे, याचा प्रत्यक्ष प्रत्यय नुकताच नागरिकांना आला. पाली येथून ४२ प्रवासी घेऊन पाच्छापूरकडे जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसला दुपारी भीषण अपघाताला सामोरे जावे लागले असते. रस्त्यावरील प्रचंड खड्डे आणि चिखलातून वाट काढताना ही एसटी बस थेट रस्त्याखाली गेली आणि पलटी होता-होता थोडक्यात वाचली. सुदैवाने चालकाने दाखवलेल्या कमालीच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला असून सर्व



४२ प्रवासी सुखरूप आहेत.

पाली डेपोतून सुटलेली दुपारी १२:४५ ची पाली-पाच्छापूर-दर्यागाव ही एसटी बस प्रवासी घेऊन नेहमीप्रमाणे पाच्छापूरकडे निघाली होती. दुपारी साधारण एकच्या सुमारास, पाच्छापूर गावाच्या अवघ्या दीड किलोमीटर अलीकडे आली असता, रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यामुळे आणि चिखलामुळे बसचे नियंत्रण सुटले. बस रस्त्याच्या बाजूला घसरली आणि एका बाजूला अत्यंत धोकादायक पद्धतीने कलंडली.

बस पलटी होत असल्याचे जाणवताच प्रवाशांमध्ये एकच आक्रोश आणि घबराट निर्माण झाली. मात्र, चालकाने गाडीवर ताबा मिळवल्याने बस थांबली आणि मोठा अपघात टळला.

# पोलादपूर शहरात साकारतोय स्कायवॉक!

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहरातील श्री काळभैरवनाथ मंदिर आणि प्रभातनगर पूर्वदरम्यान स्कायवॉक उभारण्यासाठी गर्डर टाकण्याचे काम सुरू झाले आहे.हा स्कायवॉक पूर्ण झाल्यानंतर तो पोलादपुरातील सहावा पूल ठरणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान पोलादपूर शहरात हा मार्ग अंडरपास म्हणजे जमिनीखालून मध्यभागी ३५ फूट खोल खंदकातून नेण्यात आला. यामुळे पोलादपूर शहराचे दोन भाग झाले.

यानंतर शहरात तांबडभुवन, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, पोलीस ठाण्याची जुनी इमारत, एसटी बसस्थानक मार्ग आणि पाचवा पूल गोकुळ नगर रस्त्याकडे जाण्यासाठी उभारण्यात आला.



# खालापूर पंचायत समितीकडून टीबीमुक्त ग्रामपंचायतींचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पंचायत समिती यांच्या वतीने टीबी मुक्त ग्राम पंचायत यांचा सभापती कृष्णा पारंगे, उप सभापती भाई शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सन २०२५ च्या "टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियान" अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या "टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियान" अंतर्गत खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीने क्षयरोग निर्मूलनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सन २०२५ करिता खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीची



पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली आहे.क्षयरोगमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी ज्या ज्या ग्रामपंचायतीने सातत्यपूर्ण केलेल्या कार्याचा गौरव करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे, असे सभापती कृष्णा पारंगे यांनी सांगितले.

खोकताना कफातून रक्त पडणे,संध्याकाळच्या वेळी हलका ताप येणे,अचानक वजन कमी होणे आणि खूप थकवा जाणवणे,रात्रीच्या वेळी जास्त घाम येणे ही टीबी ची कारणे आहेत. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये टीबीचे निदान आणि औषधोपचार पूर्णपणे मोफत दिले जातात, असे प्रास्ताविक मध्ये डॉ.कल्याणी इंगोले तालुका आरोग्य अधिकारी (गट अ) यांनी सांगितले.

# ओहळात दुचाकी कोसळून तरुणीचा मृत्यू; चालक गंभीर जखमी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोली गावाच्या हद्दीत गुरुवारी (दि. २ जुलै) झालेल्या भीषण दुचाकी अपघातात १८ वर्षीय तरुणीचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकी चालक गंभीर जखमी झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वर गणेश पवार रा. पाटणसई आदिवासीवाडी, ता. रोहा हा त्याची मैत्रीण वृषाली अंकुश वाघमारे रा. तासगाव आदिवासीवाडी, ता. मुरुड हिला यामाहा दुचाकीवरून अलिबाग-रोहा मार्गाने घेऊन जात होता. सुडकोली गावाजवळील धोकादायक वळणावर चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन थेट रस्त्याखालील ओहळात कोसळले. अपघात चालक ईश्वर पवार याचा डावा पाय फ्रॅक्चर होऊन तो गंभीर जखमी झाला. तर मागे बसलेली वृषाली वाघमारे हिला गंभीर दुखापत



झाल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. पावसामुळे ओहळातील पाण्याचा प्रवाह वाढलेला असल्याने दुचाकी बाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागली.या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# डॉक्टरांनी रुग्णांची काळजीपूर्वक हाताळणी करावी -डॉ. तासगावकर

**कर्जत : प्रतिनिधी**

डॉक्टर पेशाला मनुष्याच्या जीवनात फार महत्व आहे. त्यामुळे प्रसंगी डॉक्टरांना देव मानणारा समाज आपल्याकडून एखादी चूक झाल्यानंतर दवाखान्याची मोडतोड करायला पुढे येतो. त्यामुळे आपण रुग्णांची काळजीपूर्वक कोणत्याही चुका न करता सुश्रुषा करावी. रुग्ण आपल्या बोलण्याने अर्धा बरा होत असतो आणि त्यामुळे रुग्णांची सेवा करताना समाजाला दिशादर्शक ठरेल अशीच करावी. असे मार्गदर्शन डॉ नंदकुमार तासगावकर यांनी डॉक्टर्स डे निमित्त केले.



डॉक्टर्स डे निमित्त रायगड हॉस्पिटल अँड सेंटर मध्ये कॉन्फरन्स हॉल मध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर,संस्थेचे विकास संचालक बुदल तासगावकर - कुलकर्णी तसेच कार्यकारी संचालक नागसेन कांबळे, महेश काशिद, रमाकांत तरे यांच्यासह रुग्णालयाचे डीन डॉ. विनायक सबनीस, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आशिष बोंगिनवार, उप वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल सातव, ॲडमिनिस्ट्रेशन विभाग प्रमुख डॉ धनश्री कदम, कोआरटीम मेंबरे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटांवर नियंत्रणासाठी खोपोली पोलीस ठाणे सज्ज

**खोपोली : प्रतिनिधी**

"आपत्तीची नको भीती, पूर्वतयारी हीच नीती" या ब्रीदवाक्याला केंद्रस्थानी ठेवत खोपोली पोलीस ठाण्याच्या वतीने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध आपत्कालीन परिस्थितींना सामोरे जाण्यासाठी विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या शिबिरातून आपत्तीसमयी त्वरित प्रतिसाद, संसाधनांची उपलब्धता आणि विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक सक्षम करण्याचा हेतू स्पष्ट करण्यात आला.या शिबिरात पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी,नगरपालिका अग्निशमन दल, हेल्प फाउंडेशन, यशवंतीहायकर्स,उपस्थित होते.



# पावसाळ्यातील दुर्घटना टाळण्यासाठी मनपा सज्ज

## धोकादायक इमारती रिकाम्या करण्याचे आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींबाबत नागरिकांनी अत्यंत सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.



धोकादायक इमारतीत राहून कोणतीही दुर्घटना, जीवित वा वित्तहानी होऊ नये यासाठी महापालिका कटिबद्ध असून २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार विविध प्रभागांतील एकूण ६४ सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक इमारती जाहीर करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ तसेच शासन निर्देशांनुसार महापालिकेने संबंधित इमारतींचे सर्वेक्षण करून यादी निश्चित केली आहे. या इमारतींमधील रहिवाशांना वेळोवेळी नोटिसा देऊन सदनिका रिक्त करण्यास सूचित करण्यात आले आहे.

उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाच्या आदेशानुसार संबंधित मालक, भोगवटादार व रहिवाशांना इमारती रिक्त करण्याची संधी देण्यात आली होती, मात्र काही ठिकाणी अद्यापही नागरिक वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा इमारतींमधील वीज व पाणीपुरवठा खंडित करून आवश्यक असल्यास पोलिस बंदोबस्तात इमारती रिकाम्या करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.सध्या पावसाळा सुरू असून अतिवृष्टीमुळे धोकादायक इमारती कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या व कुटुंबाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा इमारती तत्काळ रिकाम्या करून सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. धोकादायक इमारतीत राहून कोणतीही दुर्घटना घडल्यास जीवित वा वित्तहानीबाबत संबंधित रहिवासी, मालक व भाडेकरू स्वतः जबाबदार राहतील. तसेच इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याची जबाबदारीही संबंधित मालक व भोगवटादारांचीच राहणार असल्याचे महापालिकेने नमूद केले आहे.

धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची संपूर्ण माहिती महापालिकेच्या www.panvelcorporation.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील इमारतींबाबत जागरूक राहून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी महापालिकेच्या दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४६१५०० तसेच टोल फ्री क्रमांक १८००२२७७०१ वर संपर्क साधावा, अशी माहिती उपायुक्त रविकिरण घोडके यांनी दिली आहे.

प्रभाग समिती कार्यालयांतर्गत धोकादायक इमारतींना आयुक्तांच्या सूचनेनुसार रिक्त करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

## एनबीकेसी खेळाडूंचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या हस्ते गौरव



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय व राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत चमकदार कामगिरी करून रायगडचे नाव उज्ज्वल करणाऱ्या न्यू बॉम्बे कराटे क्लबच्या खेळाडू आणि प्रशिक्षकांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दक्षिण आशिया कराटे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या फॉस्टिना फर्नांडोच्या यशाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

न्यू बॉम्बे कराटे क्लब, रायगडच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. कराटेपटू फॉस्टिना फर्नांडो हिने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दक्षिण आशिया कराटे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे.

## कोन-सावळा रस्त्यावर वाहतूक कोंडी

### जि.प.सदस्या अनन्या गाताडे यांचे वाहतूक शाखेला पत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांच्या सुखकर प्रवासासाठी उरणचे आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून बनवण्यात आलेल्या कोन-सावळा रस्त्यावर सध्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी रायगड जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे यांनी वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना लेखी पत्र दिले आहे.



या पत्रामध्ये त्यांनी रस्त्यावरील बेकायदेशीर पार्किंग आणि त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा पाढा वाचला असून प्रशासनाने तातडीने पावले न उचलल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. या मार्गावर इंडेव लॉजिस्टिक, आष्टे लॉजिस्टिक, जे एस डब्ल्यू लॉजिस्टिक, अपोलो लॉजिस्टिक आणि टेक केअर लॉजिस्टिक यांसारख्या मोठ्या कंपन्या आहेत. मात्र स्वतःची पार्किंग व्यवस्था नसल्याने त्यांच्या गाड्या थेट कोन-सावळा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पार्क केल्या जातात. याचे निवारण करण्यासाठी वाहतूक विभागाने पुढाकार घेऊन संबंधित कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत तातडीने संयुक्त बैठक आयोजित करावी व पार्किंगच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी गाताडे यांनी केली.

यावेळी अविनाश गाताडे, अतुल घरत, आत्माराम पाटील, अविनाश मुंडे, प्रशांत मुंडे, दीपक बारवी, रवी राठोड, चंदर माने, हर्ष जाधव, प्रभाकर राठोड, भावेश माळी, प्रफुल्ल मते, संतोष चौलकर, रोहिदास भोंडे, बंडू शीद आदी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात राष्ट्रीय डॉक्टर्स आणि सीए डेनिमित्त विशेष मार्गदर्शन सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. १) राष्ट्रीय डॉक्टर्स डे व सीए डेचे औचित्य साधून मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील करिअरच्या दृष्टीने योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित डॉक्टर्स डेच्या सत्रात टाटा मेमोरियल सेंटरच्या मेडिकल ऑन्कोलॉजी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमित जोशी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय व्यवसायाचा प्रवास, डॉक्टर होण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण, नीट परीक्षेचे महत्त्व, एमबीबीएस अभ्यासक्रम व वैद्यकीय क्षेत्रातील आव्हाने व करिअरच्या विविध संधींबद्दल माहिती दिली, तर सीए डेनिमित्त १२वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सीए करिअर मार्गदर्शन विषयावर विशेष सेमिनार घेण्यात आले.

कार्यक्रमाला माजी विद्यार्थी आणि सध्या यशस्वी चार्टर्ड अकाउंटंट म्हणून कार्यरत असलेले सीए गुरुदत्त मोहन व सीए सौरभ कहादने हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

## राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त डॉक्टरांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून पनवेल शहरात डॉक्टरांचा विशेष सत्कार सोहळा आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे अत्यंत उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले होते. कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा बुधवारी (दि. १) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाला. यावेळी समाजसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्थानिक डॉक्टरांचा जाहीर सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील यांनी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले आणि डॉक्टरांचा यथोचित गौरव केला. उपस्थित डॉक्टर आणि नागरिकांसाठी विहीणबाई जोरात... या लोकप्रिय आणि मनोरंजनात्मक नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला, ज्याचा सर्वांनी भरभरून आनंद घेतला.

या सोहळ्याला डॉ. दीपक पुरोहित, डॉ. गिरीश गुणे, शैलेश पालेकर, अनिल परमार, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. जयश्री पाटील, काशिनाथ पाटील, भगीरथ गोस्वामी, पराग बेडसे, ॲड. हितेश रजपूत, रुपेश यादव, डॉ. दीपक खोत यांच्यासह डॉक्टर, रोटरी क्लबचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## पनवेल रेल्वेस्थानक परिसरातून दोन लाखांचा गांजा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी पहाटेच्या गस्तीदरम्यान केलेल्या कारवाईत १८ किलो ८०० ग्रॅम गांजासह दोन संशयितांना अटक केली. या कारवाईमुळे रेल्वे स्थानक परिसरातील अमली पदार्थ तस्करीला मोठा दणका बसला असून पोलिसांनी तस्करीच्या जाळ्याचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २ जुलै रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास पनवेल रेल्वे स्थानकाच्या परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या दोघांची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडील पिशव्यांची झडती घेतली असता त्यामध्ये गांजा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ दोघांना ताब्यात घेतले.या कारवाईत आरोपींकडून विविध पिशव्यांमध्ये ठेवलेला १८ किलो ८०० ग्रॅम गांजा, तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या साहित्यांसह मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण जप्त मालाची किंमत २,२२,०८० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वपोनि बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्तात्रेय देवकते व त्यांच्या पथकाने केली. दरम्यान, आरोपींकडून अमली पदार्थांचा पुरवठा कुठून केला जात होता याचा शोध पोलीस घेत आहेत.



**पनवेल : सिसमॅक आयटी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा २१वा वर्धापन दिन तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांच्या पनवेल येथील निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी सिसमॅक कंपनीच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शाल, सन्मानपत्र आणि विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सिसमॅक आयटी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर फिरोज सय्यद, शादाब शेख, मॅनेजर अर्जुन कांबळे, अर्चना कडू, नवीद हुरझुक, मिलिन पाटोळे यांच्यासह संपूर्ण सिसमॅक टीम उपस्थित होती.**



## 'सीकेटी'चे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांना सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी इंग्रजी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण सेवानिवृत्त होत असल्याने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी बुधवारी (दि. १) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चव्हाण यांनी गेली २१ वर्षे सलग सेवा देत संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम कार्य केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक चव्हाण यांच्या पत्नी स्मिता चव्हाण, पुत्र समर्थ, सीकेटी इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, इंग्रजी माध्यमिकच्या नव्या मुख्याध्यापिका स्वाती काळे आणि शिक्षकवृंद, माजी शिक्षक भरत जितेकर, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी भावूक झाले होते. त्यांनी मुख्याध्यापक चव्हाण यांच्या वाटचालीबद्दल गौरवोद्गार काढले.

विशेष म्हणजे याच दिवशी त्यांचा वाढदिवसही असल्याने पुढील आरोग्यदायी व दीर्घायुषी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



**पनवेल : सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी आपल्या ६०व्या वाढदिवसानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. मुख्याध्यापक पदावरून सेवामुक्त झाल्यावर त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी नोड येथे शैक्षणिक कामकाज निरीक्षक तथा मार्गदर्शक म्हणून कार्यभार स्वीकारला आहे.**

## 'सुएसो'च्या वर्धापनदिनी गुणवंतांचा सन्मान

### ■ महापौर नितीन पाटील यांची उपस्थिती

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमास महापौर नितीन पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



यावेळी बोलताना महापौर नितीन पाटील म्हणाले, सुधागड केवळ शैक्षणिक संस्था नसून एक परिवार आहे. या परिवाराच्या प्रमुख म्हणून अध्यक्ष गीताताई पालरेचा यांची जबाबदारी मोठी आहे. त्या ही जबाबदारी समर्थपणे पार पाडत आहेत. ते पुढे म्हणाले की, सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक स्व. दादासाहेब लिमये यांनी लावलेले शिक्षणाचे रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. त्या रोपट्याचे संगोपन करण्याचे कार्य स्व. वसंतराव ओसवाल यांनी केले, तर आता संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा गीताताई पालरेजा यांच्या नेतृत्वाखाली संस्था प्रगतीची नवी शिखरे गाठत आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे संस्था नावारूपाला येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात दहावीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू माध्यमातील तसेच इयत्ता बारावीच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीताताई पालरेजा, उपमहापौर प्रमिला पाटील, नगरसेवक रामदास शेवाळे, विजय खानावकर, रवींद्र भगत, नगरसेविका सरस्वती काथारा, सायली सरक, अजय सूर्यवंशी, प्राचार्य राजेंद्र पालवे, सुभाष गायकवाड, रवींद्र पाटील, तुकाराम सरक, उपप्राचार्य संजय पाटील, पर्यवेक्षक लक्ष्मण मगरे-पाटील, भागवत खेडकर, धर्मेंद्र दीक्षित, पूनम कांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## संपादकीय

# दीर्घकालीन दृष्टिकोन

महाराष्ट्रातील पुढील पिढ्यांना दुष्काळ पाहू देणार नाही असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच कृषी दिनी व्यक्त केला. त्यांचे हे विधान राज्याच्या जलव्यवस्थापनाच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचे प्रतीक असून विरोधकांनी या विधानाकडे निव्वळ राजकीय घोषणा म्हणून पाहू नये. राज्यातील शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि फायदेशीर करण्यासाठी विविध योजना सरकारकडून राबवल्या जात आहेत.

**महाराष्ट्र हे भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेले राज्य असून काही भागात अतिवृष्टी तर काही भागात पावसाची अनिश्चितता हे वास्तव गेली काही वर्षे राज्यात सातत्याने दिसते आहे. त्यामुळे दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी केवळ पावसावर अवलंबून राहून चालणार नाही तर पाणी साठवण, संवर्धन आणि योग्य नियोजन यांचा संगम साधणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत राज्य सरकारने जलसंधारणाच्या क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. 'जलयुक्त शिवार'सारख्या योजनांमुळे गावपातळीवर पाणी अडविण्याची आणि भूजलपातळी वाढविण्याची चळवळ निर्माण झाली आहे. अनेक भागांमध्ये विहिरी आणि बोअरवेल्सची पाण्याची पातळी सुधारल्याचे अनुभव समोर आले आहेत. याशिवाय धरणांची उभारणी, कालव्यांचे जाळे, नदीजोड प्रकल्प आणि आधुनिक सिंचन पद्धतींना दिलेले प्रोत्साहन यामुळेही पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर शक्य होणार आहे. यंदाच्या मान्सून हंगामात जून महिन्यात पावसाने ओढ दिली. जुलै महिन्यात देशात सरासरीच्या ९४ टक्के पाऊस होईल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असून राज्यात विदर्भ वगळता इतरत्र पाऊस कमी होण्याचे भाकित वर्तवण्यात आले आहे. येत्या काही दिवसांत मात्र विदर्भ आणि पश्चिम किनारपट्टीवरील भागांत पावसाचा जोर असणार आहे. त्यामुळे काही भागांमध्ये समाधानकारक जलसाठा निर्माण होण्याची अपेक्षा आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित होत असताना जलसुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. त्यामुळेच दीर्घकालीन नियोजनात केवळ पिण्याच्या पाण्याचीच नव्हे तर शेती आणि उद्योगांसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धताही सुनिश्चित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. म्हणूनच देवेंद्र फडणवीस यांच्या विधानामागील महत्त्वाचा संदेश म्हणजे दुष्काळावर तात्पुरते उपाय करण्यापेक्षा कायमस्वरूपी तोडगा शोधण्याची मानसिकता निर्माण करणे हा आहे. पूर्वी दुष्काळ पडला की टँकर, चारा छावण्या आणि मदत पॅकेज यांवर भर दिला जात असे. आज मात्र जलस्रोतांची निर्मिती, पुनर्भरण आणि व्यवस्थापन यांवर भर दिला जात आहे. ही विचारसरणी स्वागतार्हच म्हणावी लागेल. अर्थात, दुष्काळमुक्त महाराष्ट्र घडविण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही. नागरिकांनीही पाणी बचतीच्या सवयी अंगीकारणे, पावसाचे पाणी साठवणे, भूजलाचा जबाबदारीने वापर करणे आणि स्थानिक जलसंधारण उपक्रमांत सहभागी होणे आवश्यक आहे. शासन आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच जलसुरक्षेचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. महाराष्ट्राच्या विकासाचा पाया हा पाण्यावर अवलंबून आहे. शेती, उद्योग, शहरे आणि ग्रामीण भाग यांचे भवितव्य जलव्यवस्थापनाशी जोडलेले आहे. जलसंधारण व सिंचन सुविधांसोबतच सौर कृषी पंप, दिवसा मोफत वीज, कृषी यांत्रिकीकरण, प्रमाणित बियाणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार अशा विविध योजनांद्वारे सरकार कार्यरत आहे. या साऱ्याच्या एकत्रित परिणामातूनच महाराष्ट्र खऱ्या अर्थाने जलसमृद्ध आणि सक्षम राज्य म्हणून पुढे येईल. सरकारने आखलेल्या योजनांना सातत्य आणि जनसहभागाची जोड मिळाली तर दुष्काळ हा नक्कीच महाराष्ट्राच्या इतिहासाचा भाग होईल.**

# दुग्ध व्यवसायातून रोजगाराच्या नव्या वाटा





भारतात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व केवळ पोषणापुरते मर्यादित नाही. हा व्यवसाय लाखो कुटुंबांसाठी रोजगाराचे, स्वावलंबनाचे आणि ग्रामीण विकासाचे साधन बनला आहे. भारत आज जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. २०२५-२६ मध्ये देशाचे एकूण दूध उत्पादन २३० दशलक्ष टनांच्या पुढे गेले आहे. या उत्पादनामागे आहेत ८ कोटींहून अधिक दूध उत्पादक शेतकरी आणि त्यांच्याशी जोडलेले लाखो लोक. दुग्ध व्यवसाय आज शेतीला जोडधंदा राहिलेला नसून, स्वतंत्र, शाश्वत आणि फायदेशीर उद्योग म्हणून उदयास येत आहे. दुग्ध व्यवसायाची सर्वात मोठी ताकद म्हणजे हा व्यवसाय वर्षभर उत्पन्न देतो. खरीप-रब्बी हंगामावर अवलंबून असलेल्या शेतीला यामुळे आर्थिक स्थैर्य मिळते.

एका अंदाजानुसार २-३ दुधाळ जनावरे सांभाळणारे कुटुंब दरमहा ८,००० ते १५,००० रुपये निव्वळ कमवू शकते. याशिवाय या क्षेत्रातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात. गायी-म्हशींचे संगोपन, चारा व्यवस्थापन, दूध काढणे, स्वच्छता यात महिला वर्गाचा सहभाग ७०% हून अधिक आहे. महिलांना घरबसल्या उत्पन्नाचे साधन मिळते. गावोगावी दूध संकलन केंद्रे, शीतकरण केंद्रे, टँकरने प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक यातून वाहनचालक, मदतनीस, तंत्रज्ञ यांना रोजगार मिळतो. दूध पाश्चरायझेशन, पॅकिंग, तूप, लोणी, पनीर, दही, आइस्क्रीम, चीज, मिल्क पावडर निर्मिती सहकारी व खाजगी डेअरी प्लांटमध्ये हजारो कुशल-अकुशल कामगार कार्यरत आहेत. दूध वितरक, दुकानदार, फ्रँचायझी, ऑनलाइन डिलिव्हरी, 'दूध ॲप' आधारित स्टार्टअप्समुळे तरुणांना नव्या संधी मिळत आहेत. पशुखाद्य निर्मिती, खनिज मिश्रण, पशुवैद्यकीय सेवा, कृत्रिम रेतन, गोठा उभारणी, दूध यंत्रसामग्री दुरुस्ती, शेणापासून बायोगॅस-खत निर्मिती असे पूरक व्यवसायही उभे राहिले आहेत. अशा प्रकारे एक लिटर दूध तयार होऊन ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंत किमान ५-६ जणांना रोजगार मिळतो. लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी दुग्ध व्यवसाय वरदान ठरतो आहे. १-२ एकर शेती असणारा शेतकरी २ संकरीत गायी किंवा म्हशी पाळून महिन्याला खात्रीशीर उत्पन्न मिळवू शकतो. चाऱ्यासाठी शेतातील कडबा, मकाचा कडबा, उसाचे वाढे वापरता येतात. शेणखतामुळे जमिनीचा पोत सुधारतो, रासायनिक खतावरील खर्च कमी होतो.

विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील 'सखी दूध उत्पादक गट' हे उत्तम उदाहरण. १५ महिलांनी एकत्र येऊन ३० गायींसह सुरुवात केली. आज त्यांच्याकडे २०० लिटर दैनंदिन संकलन असून, पनीर-तुपाची विक्री करून प्रत्येक महिलेला महिना १२,००० रुपये मिळतात. आजचा सुशिक्षित तरुण पारंपरिक नोकरीऐवजी दुग्ध व्यवसायाकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहत आहे. डेअरी फार्म मॅनेजमेंट, IoT आधारित मिल्किंग मशीन, बल्क मिल्क कूलर, सायलेज मेकिंग, A२ मिल्क ब्रँडिंग, फ्लेवर्ड मिल्क, श्रीखंड-आम्रखंडाचे युनिट अशा नव्या संकल्पना राबवल्या जात आहेत. पुण्यातील एका २८ वर्षीय इंजिनिअर तरुणाने नोकरी सोडून २० गायींचा 'स्मार्ट डेअरी फार्म' सुरू केला. मोबाईल ॲपवरून ग्राहकांना थेट घरपोच A२ दूध पुरवठा करून तो वर्षाला १८ लाख उलाढाल करतो आहे. त्याच्याकडे ७ स्थानिक तरुण कामाला आहेत. ग्रामीण भागात महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी दुग्ध व्यवसाय सर्वात सोपा व यशस्वी मार्ग आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिला एकत्र येतात, कर्ज घेऊन जनावरे खरेदी करतात आणि दूध संघांना दूध घालतात. दूधाचे पैसे थेट बँक खात्यात जमा झाल्याने महिलांच्या हातात पैसा येतो. यामुळे त्यांचा कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढतो, मुलांचे शिक्षण व आरोग्य यावर खर्च करता येतो. 'अमूल' पॅटर्नने देशभरातील लाखो महिलांना उद्योजिका बनवले आहे. केवळ कच्चे दूध विकण्यापेक्षा त्यावर प्रक्रिया करून पदार्थ बनवल्यास २ ते ५ पट अधिक नफा मिळतो. १ लिटर दुधाचे तूप केल्यास ३००-४०० रुपये, पनीर केल्यास २५०-३०० रुपये मिळतात. त्यामुळे गावपातळीवर छोटे प्रक्रिया युनिट सुरू होत आहेत. कोल्हापूर, सांगली भागात अनेक तरुण 'मिनी दूध प्रक्रिया युनिट' चालवतात. १००-२०० लिटर क्षमतेच्या युनिटमधून पेढे, बर्फी, लस्सी, तूप बनवून स्थानिक बाजारपेठेत विकले जाते. एका युनिटमागे ३-४ जणांना कायमस्वरूपी रोजगार मिळतो. दुग्ध व्यवसाय अधिक नफ्यात आणण्यासाठी शास्त्रीय पद्धती महत्त्वाच्या आहेत. चांगल्या जातीच्या गायी-म्हशी, संतुलित आहार, लसीकरण, स्वच्छ गोठा, वेळेवर कृत्रिम रेतन यामुळे दूध उत्पादन २०-३०% वाढते.

यासाठी कृषी विज्ञान केंद्रे, पशुसंवर्धन विभाग, दूध संघ नियमित प्रशिक्षण देतात. मोबाईल ॲपवरून पशुखाद्याचा तक्ता, रोगनिदान, डेअरी व्यवस्थापनाचे धडे मिळतात. 'ई-गोपाला' ॲपसारखे प्लॅटफॉर्म शेतकऱ्यांना थेट तज्ज्ञांशी जोडतात. दुग्ध व्यवसाय हा 'सर्क्युलर इकॉनॉमी'चे उत्तम उदाहरण आहे. जनावरांना पिकांचे अवशेष चारल्याने कचरा व्यवस्थापन होते. शेणापासून बायोगॅस निर्मिती करून इंधनाचा खर्च वाचतो, उरलेल्या स्लरीपासून उत्तम सेंद्रिय खत मिळते. यामुळे रासायनिक खतावरील अवलंबित्व कमी होते व जमिनीचे आरोग्य सुधारते. एक १० जनावरांचा गोठा महिन्याला ४-५ सिलिंडर एवढा गॅस देऊ शकतो. भारतात दरडोई दूध उपलब्धता ४५९ ग्रॅम आहे, जी जागतिक सरासरीपेक्षा जास्त आहे. तरीही वाढती लोकसंख्या, बदलती जीवनशैली, प्रोटीनयुक्त आहाराची जागरूकता यामुळे दूध व दुग्ध पदार्थांची मागणी दरवर्षी ५-६% ने वाढत आहे. ऑर्गनिक दूध, A२ दूध, प्रोबायोटिक दही, चीझ, फ्लेवर्ड मिल्क याला शहरी भागात मोठी मागणी आहे. निर्यातक्षम दुग्ध उत्पादने तयार केल्यास ग्रामीण युवकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळू शकते. दुग्ध व्यवसाय हा केवळ शेतीला पूरक जोडधंदा न राहता, स्वतंत्र उद्योग म्हणून लाखो कुटुंबांना रोजगार देत आहे. कमी भांडवल, घरबसल्या व्यवस्थापन, रोजचे उत्पन्न आणि महिलांचा मोठा सहभाग यामुळे हा व्यवसाय ग्रामीण भारताचा आर्थिक कणा बनला आहे.

योग्य प्रशिक्षण, तंत्रज्ञानाची जोड आणि मूल्यात भर घालणाऱ्या प्रक्रिया उद्योगामुळे येत्या काळात दुग्ध व्यवसायातून रोजगाराच्या आणखी नवनवीन वाटा निर्माण होतील. गरज आहे ती फक्त योग्य नियोजन, सातत्य आणि दर्जा जपण्याची. दुधाची एक धार केवळ घराचीच नाही, तर संपूर्ण गावाची अर्थव्यवस्था समृद्ध करू शकते.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### स्मार्टवॉचमधील हार्ट रेट किती अचूक असतो?

आजकाल मनगटावर असलेले स्मार्टवॉच अनेकांसाठी आरोग्याचा 'मिनी डॉक्टर' झाले आहे, पण त्यातील हार्ट रेट खरंच किती अचूक असतो, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. स्मार्टवॉचमध्ये PPG म्हणजेच फोटोप्लेथिस्मोग्राफी सेन्सर वापरला जातो. हा सेन्सर हिरव्या रंगाचा LED प्रकाश त्वचेवर टाकतो. हृदयाचे ठोके पडताना रक्तवाहिन्यांमधील रक्ताचे प्रमाण वाढते-घटते.



त्यावेळी हिरवा प्रकाश किती शोषला गेला किंवा परावर्तित झाला यावरून सेन्सर रक्तप्रवाहाचा ग्राफ तयार करतो आणि त्यावरून मिनिटाला हृदयाचे ठोके किती आहेत ते मोजतो.सामान्य परिस्थितीत, म्हणजे तुम्ही शांत बसला असाल किंवा हलके चालत असाल, तेव्हा या सेन्सरची अचूकता बऱ्यापैकी चांगली असते.

अनेक अभ्यासांनुसार चालणे, हलकी धावणे यावेळी स्मार्टवॉचची अचूकता ८५ ते ९० टक्यांपर्यंत असते. म्हणजे वैद्यकीय ECGच्या तुलनेत ५-१० ठोक्यांचा फरक पडू शकतो. फिटनेस ट्रॅकिंगसाठी, तुमचा हार्ट रेट झोन समजण्यासाठी हे पुरेसे आहे. व्यायाम करताना तुम्ही 'फॅट बर्न झोन' मध्ये आहात की 'कार्डिओ झोन' मध्ये, हे ढोबळमानाने कळते.पण काही वेळा हे रीडिंग चुकीचेही येऊ शकते. मनगटावर टॅटू असेल, त्वचेचा रंग खूप गडद असेल, किंवा घड्याळ खूप सैल बांधले असेल तर सेन्सरला रक्तप्रवाह नीट 'वाचता' येत नाही. हात खूप हलत असेल, जसे की टेनिस खेळताना किंवा वजन उचलताना, तेव्हाही रीडिंगमध्ये चूक होण्याची शक्यता जास्त असते. थंड हवेत रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यानेही सेन्सरला सिग्नल मिळत नाही.

आजकाल अनेक प्रीमियम स्मार्टवॉचमध्ये 'अनियमित हृदयगती' म्हणजेच Atrial Fibrillation (AFib) ओळखण्याची सुविधा आहे. Apple Watch, Samsung Galaxy Watch यांसारख्या काही कंपन्यांच्या वॉचला यासाठी अमेरिकेच्या FDAकडून मान्यताही मिळाली आहे. वॉच दिवसभरातील हृदयाचे ठोके तपासते व अनियमित पॅटर्न दिसला तर नोटिफिकेशन देते. हे खूप उपयुक्त फीचर आहे. कारण AFib मुळे पक्षाघाताचा धोका वाढतो आणि अनेकदा रुग्णाला लक्षणेच जाणवत नाहीत. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की स्मार्टवॉच 'स्क्रीनिंग'चे साधन आहे, निदान करण्याचे नाही.

# इतिहासकार, नाटककार दत्तात्रय गोडसे



## निमित्त

दत्तात्रय गणेश गोडसे हे इतिहासकार, नाटककार, चित्रकार, नेपथ्यकार, लेखक, कला समीक्षक व १९८८चे संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते होते. त्यांनी वि.का. राजवाडे, म.वि धोंड यांना अनुसरून फक्त मराठी भाषेत लेखन केले.

द.ग. गोडसे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील वाघोडे येथे ३ जुलै इ.स. १९१४ रोजी झाला. त्यांनी शालेय शिक्षण सावनेरला, आणि कॉलेज शिक्षण नागपूरच्या मॉरिस आणि नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजातून घेतले. त्यांनी लंडन विद्यापीठाच्या 'स्लेड स्कूल ऑफ फाइन आर्ट'मधून ललितकलेचे प्रशिक्षणही घेतले.

गोडसे यांनी मराठीत अनेक विषयांवर लिखाण केले. शिवाजी-मस्तानी-रामदास या ऐतिहासिक व्यक्तींवर, मराठी वाङ्मय-नाटकांवर, चित्रकला-शिल्पकला-वास्तुकलांवर आणि अगदी बुद्धकालीन स्थापत्यावर गोडसे लिहीत असत. थॉमस डॅनियल ने इ.स. १७९० साली पेशव्यांच्या दरबाराचे एक रंगचित्र काढले होते. त्यावरही गोडसेंनी एक लेख लिहिला होता. त्यांचा मराठी चित्रकार दीनानाथ दलाल यांच्यावर लिहिलेला भारलेल्या जगातून आलेला अलौकिक माणूस हा लेख अतिशय गाजला होता. ना.सं. इनामदार यांनी 'राऊ' ही कादंबरी लिहिताना द.ग. गोडसे यांची खूप मदत झाली, असे त्या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. द.ग. गोडसे यांनी आपल्या चित्रांनी अनेक मासिके आणि पुस्तके सजवली. १०७हून अधिक नाटकांचे ते नेपथकार होते. तीन मराठी आणि दोन हिंदी चित्रपटांचे ते कलादिग्दर्शकही होते.

साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील घटना, ढोंगबाजी, गटबाजी, मक्तेदारी, भाषेचा-आशयाचा बोजडपणा, नावीन्याच्या आणि प्रयोगशीलतेच्या नावाखाली चाललेला भोंगळपणा हे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या या 'वाद-संवादा'चे विषय असत. वृत्ती-प्रवृत्तींवर टीका केली जाई आणि ती व्यक्तिगत पातळीवर घसरणार नाही, याची काळजीही घेतली जाई. शमा आणि निषाद म्हणजे अनुक्रमे द.ग.गोडसे आणि मं.वि. राजाध्यक्ष यांनी हे चुरचुरीत आणि पौष्टिक सदर जवळजवळ नऊ वर्षे चालवले. त्या काळात या सदरावर अनेकांचा रोषही ओढवला, पण अशी वृत्तिलक्ष्यी टीका वाचण्याची सवय वाचकांना लागली. 'टवाळा आवडे विनोद' या वचनाला छेद देणारे लेखन द.ग. गोडसे यांनी या सदरात सातत्याने केले.

१९४३ ते ५३ या वर्षांतील या सदरांचे निवडक संकलन वाद-संवाद (निषाद आणि शमा) याच नावाने प्रसिद्ध झाले आहे. तात्कालिक लेखन वगळून आजही प्रस्तुत वाटेल, असे लेख यात घेतल्याचे संपादकांनी म्हटले आहे. 'मुद्रणसाक्षेप' किंवा 'पदवी आणि प्रबंध' असे लेख याची उत्तम उदाहरणे आहेत.

द.ग. गोडसे यांच्याविषयी वाङ्मयशास्त्रविद्, भाषाशास्त्री आणि चिन्हाभ्यासशास्त्रतज्ज्ञ अशोक रामचंद्र केळकर यांनी लिहिले आहे, 'गोडसे यांचे कलेच्या इतिहासासंबंधीचे लिखाण क्वचित विवाद्य असले तरी जीववादाच्या दृष्टिकोनातून अतिशय मोलाचे आहे. गोडसे यांनी केवळ मराठीतच लिहिण्याचे जे ठरविले, त्यामुळे मराठी वाचकांना अपरिमित लाभ झाला आहे. ५ जानेवारी इ.स. १९९२ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## स्माइल डिप्रेशन : चेहऱ्यावर हसू अन् हृदयात आसू!

चेहऱ्यावर सतत हास्य, बोलण्यात उत्साह, सामाजिकदृष्ट्या सक्रिय आणि मनमिळावू स्वभाव, पण याच व्यक्तीच्या हृदयात वेदनेची खोल नदी वाहत असते. ही अवस्था म्हणजेच स्माइल डिप्रेशन होय. समोरून पाहणाऱ्याला ती व्यक्ती आनंदी वाटते, पण आतून ती मानसिक संघर्ष, निराशा, एकटेपणा आणि थकलेली असल्याचे दिसते. या मानसिक आजाराची भीती एवढी आहे की, तो लपून राहतो आणि म्हणूनच अधिक घातक ठरतो.



'स्माइल डिप्रेशन' म्हणजे नेमके आहे तरी काय?

स्माइल डिप्रेशन म्हणजे डिप्रेशनची ती अवस्था जिथे व्यक्ती चेहऱ्यावर आनंद दाखवते, पण आतून खचलेली असते. ती सामाजिकदृष्ट्या कार्यरत असते, नोकरी, दैनंदिन कामे, जबाबदाऱ्या सांभाळत असते, पण एकांतात गेल्यावर तिला खिन्नता, शून्यता, आत्मगंड, दुःख यांचा सामना करावा लागतो. हे दुखणं दिसणारे नसल्यामुळे अवस्थेतील व्यक्तींकडे अनेकदा दुर्लक्ष होते. अशावेळी कुटुंबियातील सदस्यांनी संबंधित रुग्णाशी चांगला संवाद साधावा.

कशी मात कराल?

स्वतःशी प्रामाणिक राहावे. डोळस संवाद साधावा, विश्वासार्ह मित्र, कुटुंबीय वा समुपदेशक यांच्याशी बोलावे. नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

मेंदूतील आनंददायक रसायने वाढतात, योग व ध्यानमुळे मन स्थिर राहते, डायरी लिहावी. भावना शब्दांत उतरवणे ही पहिली पायरी. मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशकाच्या सल्ल्याने औषधोपचार घेणे गरजचे असते.

चेहऱ्यावर हास्य पण डोळ्यांत रिकामेपणा, एकांतात रडू येणे किंवा भावनांचा उद्रेक, झोप न लागणे, जास्त झोप येणे, भूक कमी होणे किंवा अनियमित होणे, सतत थकवा जाणवणे, स्वतःबद्दल नकारात्मक विचार, घबराट, उत्साही वाटत असूनही आतून काहीही वाटत नसणे आदी लक्षणे आहेत. ही लक्षणे आढळताच संबंधित रुग्णांनी मानसिक रोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

स्माइल डिप्रेशन ही एक अदृश्य मानसिक समस्या आहे. समाजाने हसत खेळणाऱ्या चेहऱ्यांपलीकडे पाहायला शिकले पाहिजे, कारण अनेकदा सर्वात मोठे दुःख मूक, हसते आणि एकटे असते. त्यामुळे आपण सर्वांनी एकमेकांच्या भावनिक आरोग्याकडे जागरूकपणे पहायला हवे, असे मानसिक रोग तज्ज्ञ डॉ. सचिन हेमके यांनी म्हटले आहे.

# आरावी व श्रीवर्धन बीच विकासकामांचा मंत्री आदिती तटकरे यांनी घेतला आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला अधिक चालना मिळावी आणि समुद्रकिनाऱ्यांचा शाश्वत विकास व्हावा, यासाठी मौजे आरावी (ता. श्रीवर्धन) येथील बीच सुशोभीकरण; तसेच श्रीवर्धन बीचला ब्ल्यू फ्लॅग मानांकनासाठी सुरू असलेल्या विकासकामांचा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आढावा घेतला. संबंधित यंत्रणांनी सर्व विकासकामे दर्जेदार, वेळेत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पूर्ण करून पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.



मंत्री तटकरे यांच्या दालनात यासंदर्भात आज बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात त्या बोलत होते. बैठकीस पर्यटन विभागासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत आरावी बीच परिसरातील सुशोभीकरण, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, पर्यटकांसाठी शौचालये, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पादचारी सुविधा, प्रकाश व्यवस्था तसेच इतर आवश्यक विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

श्रीवर्धन बीचच्या ब्ल्यू फ्लॅग मानांकनासंदर्भातील कामांचा आढावा घेताना मंत्री तटकरे यांनी सांगितले. समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, सुरक्षा व्यवस्था, लाइफगार्ड सुविधा तसेच पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करु देण्यात याव्यात.

सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून निर्धारित कालावधीत कामे पूर्ण करावीत. पर्यावरणपूरक आणि शाश्वत पर्यटन विकासाला प्राधान्य देत आरावी व श्रीवर्धन हे समुद्रकिनारे राज्यातील आदर्श पर्यटनस्थळे म्हणून विकसित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी दिले.

# माणगावात कचेरी रोडवर पावसाचे पाणी तुंबल्याने नागरिकांचे हाल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा समजला जाणारा कचेरी रोड पावसाळा सुरू होताच पुन्हा एकदा जलमय झाला. दरवर्षी पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असतानाही आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी आणि वाहनचालक यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



कचेरी रोडच्या दोन्ही बाजूंना गटारे बांधण्यात आली असली तरी त्या गटारांतील पाणी पुढे वाहून जाण्यासाठी कोणताही निचऱ्याचा मार्ग उपलब्ध नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरच साचून राहते. परिणामी कचेरी रोडपासून कोकण रेल्वे पुलापर्यंत अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी तुंबते आणि संपूर्ण परिसर जलमय होतो. रस्त्यावर साचलेले घाण, चिखल आणि दुर्गंधीयुक्त पाणी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. शाळा आणि महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना नाक मुठीत धरून या रस्त्यावरून जावे लागते. महिलांना पाण्यातून वाट काढताना अपघाताची भीती सतावत असते, तर ज्येष्ठ नागरिकांनाही जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागत आहे.

हा मार्ग दिवसभर अत्यंत गजबजलेला असतो. सातत्याने सुरू असलेल्या वाहतुकीमुळे भरधाव वाहनांच्या चाकांखालून उडणारे घाण पाणी पादचाऱ्यांच्या अंगावर उडते. त्यामुळे अनेकांचे कपडे खराब होतात, तर वाहनचालकांनाही वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागते. पाण्याखाली खड्डे लपल्याने अपघात होण्याची शक्यताही वाढली आहे.

# तळा बाजारात रानभाज्यांची आवक वाढली, खवय्यांची पसंती

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा दुर्गम व डोंगराळ भाग असून अनेक जातीधर्मांचे लोक तळा तालुक्यात राहत आहेत .त्यातच अंदाजे २० पर्यंत आदिवासी वाड्या आहेत.पावसाळा सुरू झाला की,जंगलात आपोआप रानभाज्या उगवतात त्या भाज्यांचे वेध सगळ्यांना लागले असतात. ह्या भाज्या खरेदी करण्यासाठी बरीच लोक उत्साही असतात.ही भाजी मिळवण्यासाठी आदिवासी समाज रानोमाळी भटकंती करत जंगलात असणाऱ्या रानभाज्यांचे शोध घेवून रानभाज्या बाजारात विक्रीसाठी घेऊन येत असतात.गेल्या

दोन दिवसांपासून तळा बाजारात रानभाज्यांची आवक वाढली आहे.त्यात कुड्याच्या शेंगा,करटोळी,भारंगी,शेवळा,

टाकळा,अळू,तेरी, दिंडा,रानकेळी,भोकर, कुडू इत्यादी भाज्या बाजारात येत आहेत. या भाज्यांची एक जुडी



२० रूपये ते ४० रूपयांना विक्री केली जात आहे.तसेच आळंबी बाजारात यायला अजून वेळ असल्याचे बोलले जात आहे. आळंबी बाजारात दाखल झाल्यानंतर ग्राहक जास्तीत जास्त वाटे खरेदी करून आपल्या परीचीतांना सुध्दा भेट देतात. फुललेल्या आळंबीचा वाटा ३० ते ४० रूपये तर मुक्या आळंबीचा वाटा ५० ते १०० रूपयांच्या दरम्यान बाजारात विक्री केली जाते.

तसेच शेवळा ही भाजी महिलांच्या आरोग्यासाठी चांगली असून तिच्यात'ड जीवनसत्व असते.

या रानभाज्या या ठराविक काळातच मिळत असतात.तो सध्याचा काळावधी आहे. या रानभाज्यांमधे औषधी गुणधर्म असतात.पोटाचे विकार दुर होतात.शरीर तंदुरुस्त राहण्यास मदत होते.असे आर्युवेदात तर सांगितले आहेच पण जुने जाणकार वृध्द सुध्दा हेच सांगतात.तळ्यातील डोंगराळ भाग हा औषधी व रानभाज्या जास्त प्रमाणात मिळण्याचे ठिकाण आहे.

या कालावधीत या रानभाज्या मधून आदिवासींना चांगल्या पैकी अर्थिक लाभ मिळत असतो अशा प्रकारे या रानभाज्यांचा महिनाभर तरी चांगला व्यवसाय मिळत असतो. शेतकरी वर्ग व गुराखी यानांही रानभाज्यांची माहीती असल्यामुळे संध्याकाळी घरी परतताना रानभाजी घेऊन येतात व आपल्या जेवणात त्या भाज्यांचा आस्वाद घेतात.

# वावर्ले ग्रामपंचायतीकडून आरोग्य केंद्र परिसरात स्वच्छता

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र वावर्ले येथे भेट दिली असता, काही त्रुटी नजरेत आल्या, त्यामुळे ग्राम पंचायत अधिकारी प्रवीण पेमारे यांना सूचना देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते,

यानुसार ग्राम पंचायत वावर्ले सरपंच प्रिया विचारे, उपसरपंच रोशन मोरे आणि सदस्य यांनी पाहणी करून तत्काळ अंमलबजावणी केली. प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात गवताचे साम्राज्य निर्माण झाले होते, ते पूर्णपणे स्वच्छ करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विहिरीची अवस्था दुर्लक्षित झाली होती, तिची दुरुस्ती करून विहीर स्वच्छ करण्यात आली,तर विद्युत पुरवठा अखंडित राहण्यासाठी जनरेटर उघड्यावर ठेवण्यात आले होते, ते ऊन आणि पाऊस खात होते.




# सपोनि संदीप शिंगटे यांची चौक प्रभारी म्हणून नेमणूक

**चौक :** खालापूर तालुक्यातील चौक पोलीस दूर क्षेत्र प्रभारी म्हणून सहायक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांची नियुक्ती करण्यात आली असून, चौक व्यापारी असोशिएशन यांनी भेट घेऊन स्वागत केले.



सहायक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे हे भिवंडी तालुक्यातून खालापूर पोलीस ठाण्यात रुजू झाले आहेत. चौक पोलीस दूर क्षेत्र प्रभारी विशाल पवार यांची पालघर येथे बदली झाल्याने संदीप शिंगटे हे चौक येथे रुजू झाले आहेत. चौक पोलीस,चौक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष हर्षद हनुमंते, रिक्षा युनियन, पत्रकार अर्जुन कदम, विष्णू खैर, निखिल मालुसरे यांनी त्यांची भेट घेऊन स्वागत केले. चौक दूर क्षेत्र परिसरात गुन्हेगारी होणार नाही.



# वल्गनीचे चवदार मासे पकडण्यासाठी कोलाड, खांब, देवकान्हे परिसरात खवय्यांची धडपड

**म्हसळा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोलाड, खांब, देवकान्हे, बाहे, परिसरात सुरवातीचा कधी जोराचा पाऊस होतो आणि त्या पावसात कधी 'वल्गन चढते याकडेच वल्गन खवय्यांच्या नजरा लागलेल्या असतात परंतु खवळा लागेल गळाला' वल्गन आली रे..! की साऱ्या खवय्यांच्या नजरा लागतात त्या वल्गनीच्या माशांकडे तर रोहा परिसरात तसेच कोलाड खांब देवकान्हे परिसरात मागील दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे कुंडलिका आणि महिसदरा नदी पात्रात जोडले केलेले नाले आणि शिरणारे भरतीचे पाणी आणि पावसाच्या पाण्याचा जोर यामुळे खाडीतील मासळी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने ओढा, नाले आणि शेतात शिरू लागताच हे मासे मिलेल तिकडे अंडी सोडण्यासाठी पळत असतात. त्यामुळे वल्गनीचे मासे पकडण्यासाठी आणि ते खाण्यासाठी



मोठी धडपड खवय्यांची सुरू असते तर बाहे येथे चक्क या पावसात तरुणांना तब्बल सहा ते सात किलो वजनाहून अधिकचा शिवडा जातीचा मासा सापडला तर हा मासा अतिशय चवदार असल्याचे म्हटले जाते.

तसेच समुद्रातील मासेमारीला बंदी असल्याने या वल्गनीच्या माशांवर खवय्यांच्या विविधि ठीक ठिकाणी सोमवारपासून उड्या पडत आहेत. यामुळे नदी किनारी,कालव्यात, तर डोंगर भागातून वाहणारे ओढे,शेतात,वल्गनदार आपले पागीर, जाळी कांडळ हातात काठी घेऊन मासे पकडण्यात धावपळ करत असताना दिसतात तर दुसरीकडे अडचणीत आलेल्या खाडीकिनाऱ्यावरील छोट्या मच्छीमारांनाही या माध्यमातून कोळी बांधव आणि आदिवासी बांधव यांचा उदरनिर्वाह होत असतो.

रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यात तसेच विविध परिसरात रविवारपासून पाऊस सुरू झाला तर सोमवारी वटपौर्णिमेला जोरदार पाऊस पडला त्यामुळे मागील दोन तीन दिवसांपासून धुंवाधार सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे वल्गनीत शिवडा, वाम, मळ्याचे मासे, कटला,खवला, असे मासे आढळून येतात तर त्यांची चवच लय न्यारी म्हणून सारे खवय्ये वल्गनीच्या माशाकडे टक लावून बघत असतात मात्र दिसला रे दिसला आपली त्याला करत करून पकडण्यासाठी मोठी धावपळ करत अखेर त्याला आपल्या जाळ्यात ओढतात.

या दिवसात मासळी अंडी सोडण्यासाठी तसेच चिंबोऱ्या पिल्ले सोडण्यासाठी ओढे, तलावांमध्ये तसेच शेतकऱ्यांच्या शेतातही सैरावैरा धावत असतात. नदीपात्राजवळच्या शेतात आलेले मासे आणि चिंबोऱ्या पकडण्यासाठी तरुणांनी एकच गर्दी केलेली आणि जागोजागी शेतातल्या पाण्यात पाग लावलेल पाहायला गुरुवारी दिवसभर मिळत होते .

'वल्गन म्हणजे नदीचं पाणी पाटातून ओढ्यात घेणं.' गोड्या पाण्यातील हे चविष्ट मासे फक्त याच दिवसात तसेच सुरवातीच्या पावसात मिळतात. आणि हे मासे पकडले जातात ते पूर्ण पारंपरिक पद्धतीने पागछत्री टाकून, कांडलजाळं टाकून आणि काठीनेसुद्धा पकडले जातात. सुरुवातीच्या पावसातच वल्गन सापडते. वल्गनीचे मासे चवदार असल्याने कोलाड तसेच रोह्याच्या बाजारात खवय्ये त्याची चव घेण्यासाठी खरेदी करत असतात.

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

जा.क्र.: कुबनप/नगरोस्थान/साबां/२८७/२०२६-२७ | दिनांक : ०१/०७/२०२६

**जाहिर ई- निविदा सुचना क्र.१२/२०२६-२७**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत सन २०२६-२७ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०२ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.०३/०७/२०२६ ते दि.१०/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि.०७/०७/२०२६ रोजी दुपारी.१२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि. १३/०७/२०२६ रोजी दुपारी. १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## रोहा अष्टमी नगर परिषद

ता-रोहा, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०२१०९
फोन:- कार्यालय-०२१९४ २३५५२०, फॅक्स: ०२१९४-२३४०८७
Email: rohanagarpalika@gmail.com,

क्र.रोनप/बांध/निविदा/१०७९/२०२६-२७ | दिनांक०२-०७-२०२६

**जाहीर निविदा सूचना**

रोहा अष्टमी नगर परिषदेद्वारे बांधकाम विभागाकरीता खालील कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून विहित नमुन्यात दरपत्रक /कोटेशन मागविण्यात येत आहे. विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ०३/०७/२०२६ पासून दिनांक १३/०७/२०२६ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये खाली नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील. अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या आरोग्य विभागात संपर्क साधावा.

| क्र. | कामाचा तपशिल | इसारा रक्कम (रूपये) | कोरी निविदा फॉर्म फी (रूपये) | काम करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | रोहा नगर परिषद हद्दीतील प्र. क्र. १० वेदांत थळे यांच्याघराजवळचा रस्ता आणि स्लॅब बनविणे, ता. रोहा, जि रायगड | ५,१२३/- | ५००/- | कामाचे आदेश दिलेपासून १८० दिवस |
| २ | रोहा नगर परिषद हद्दीतील मेहेंदळे हायस्कूल ते कुणबी समाज भवन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, ता. रोहा, जि रायगड | ६,१४४/- | ५००/- | कामाचे आदेश दिलेपासून १८० दिवस |
| ३ | रोहा नगर परिषदेच्या डोलवहाळ पंप हाऊस येथे APFC पॅनल बसविणे व कार्यान्वित करून देणे. | ५,०००/- | ५००/- | कामाचे आदेश दिलेपासून ६० दिवस |

सही/-
(अजयकुमार एडके)
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

सही/-
(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)
नगराध्यक्षा
रोहा अष्टमी नगर परिषद

# पेणमध्ये उद्या काव्यस्पर्धा

**पेण :** साहित्याचा शब्दवेल पनवेल आणि साहित्यसंपदा पेण यांच्या वतीने काव्य स्पर्धा ४ जुलै रोजी सकाळी १० वाजता पेणमध्ये महात्मा गांधी वाचनालय येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक, इतिहासाचार्य काशिनाथ मढवी, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, मराठी साहित्य मंडळ पेणच्या माजी अध्यक्ष विभावरी जोशी उपस्थित राहणार आहेत.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २२/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात 'Critical Mineral Processing Park' विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विनंती अर्ज (RFP). | -- |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०६/०७/२०२६ ते दिनांक १३/०७/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०७/०७/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०८/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# नवी मुंबईत घरफोड्या करणारी टोळी जेरबंद

## ११ गुन्हे उघड, ११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घरफोडी आणि सोनसाखळी चोरीच्या मालिकेतील सराईत गुन्हेगारांच्या टोळीला अटक करीत नवी मुंबई गुन्हे शाखेने ११ गुन्ह्यांची उकल केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेले सोन्याचे दागिने आणि दोन दुचाकी असा एकूण ११.६७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून त्यांच्याकडून अधिक तपास सुरू आहे.

कोपरखैरणे येथील सेक्टर १२ बीमधील एका गृहनिर्माण संस्थेत ७ जून रोजी घरफोडीची घटना घडली होती. प्रमोद वादळ यांच्या घराचा दरवाजा उचकटून १५.५५ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम तसेच शेजारी राहणारे संजय नागरे यांच्या घरातील ४० हजार रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केली होती. याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखेच्या कक्ष-१ पथकाने घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. अत्याधुनिक तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने दोन संशयितांची ओळख पटविण्यात आली. दोघेही सराईत गुन्हेगार असून कायम वास्तव्य बदलत मीरा-भाईंदर, चेंबूर, मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील विविध लॉज व डॉरमेटरीमध्ये राहत असल्याची माहिती तपासात समोर आली. सलग १६ दिवस आरोपींचा मागोवा घेतल्यानंतर गुन्हे शाखेने २३ जून रोजी कोपरखैरणे परिसरातून युसूफ रशिद शेख उर्फ दीपक उर्फ राहुल (४२) आणि नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर (३२) यांना अटक केली.

चौकशीत आरोपींनी कोपरखैरणे, पनवेल तालुका, बदलापूर, वाशिंद आणि नारपोली परिसरातील नऊ घरफोड्यांची तसेच नौशादने अन्य साथीदारासह खारघर आणि बाजारपेठ परिसरातील दोन सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. या तपासात कोपरखैरणे येथील घरफोडीतील ९.४७ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने, अन्य एका गुन्ह्यातील ८४ हजार ७०० रुपयांची सोन्याची साखळी तसेच दोन दुचाकी असा एकूण ११ लाख ६७ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईसाठी गुन्हे शाखेच्या कक्ष-१ पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा सातत्याने पाठलाग करून ही कारवाई यशस्वी केली. आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून तपास सुरू आहे.

घरफोडीनंतर आरोपी कोणत्याही एका ठिकाणी न राहता दररोज वेगवेगळ्या लॉजेस आणि डॉरमेटरीमध्ये मुक्काम करीत होते. त्यामुळे त्यांचा ठावठिकाणा लावणे पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरत होते, मात्र सीसीटीव्ही विश्लेषण, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने सलग १६ दिवस आरोपींचा मागोवा घेत अखेर त्यांना कोपरखैरणे परिसरातून अटक केली. अधिक तपास सुरू आहे.

# महापौर सुजाता पाटील यांच्याकडून पावसाळी स्थितीची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

मागील तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापौर सुजाता पाटील यांनी बेलापूरपासून दिघ्यापर्यंत महापालिका क्षेत्रातील सखल भागात पाणी साचण्याच्या ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. नेरूळ येथे पाण्यातून जाताना दोन मुलींना विजेचा धक्का लागल्याची घटना घडली असून महापौरांनी रुग्णालयात जाऊन त्यांची विचारपूस केली.

महापौरांसोबत शहर अभियंता आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अजय गडदे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे प्राप्त झालेल्या माहितीनुसार नेरूळ एल. पी. उड्डाणपुलाखाली पावसाचे पाणी साठले होते. त्या ठिकाणी शुभांगी बलखंडे, वय १७, गांधीनगर, नेरूळ एमआयडीसी तसेच उज्वला वाघ, वय १९, शिरवणे गाव, सेक्टर १, नेरूळ या दोन मुलींना विजेचा झटका लागला.दोन्ही मुलींना तातडीने डी.वाय. पाटील रुग्णालय, नेरूळ येथे उपचारार्थ नेण्यात आले होते. त्यांची प्रकृती स्थिर असून आता त्या महानगरपालिकेमार्फत



फोर्टिस रुग्णालय, वाशी येथे वैद्यकीय निगराणीखाली उपचार घेत आहेत.

महापौर सुजाता पाटील यांनी दोन्ही मुलींची व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत धीर दिला आणि विजेचा शॉक नेमका कोणत्या विद्युत तारेच्या संपर्कात पाणी आल्यामुळे लागला याची तत्परतेने तपासणी करण्याचे निर्देश दिले.आज दुपारी भरतीच्या वेळी मुसळधार पाऊस सुरू असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील काही सखल भागात पावसाचे पाणी साचल्याचे निदर्शनास आले. महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार विभाग कार्यालयांमार्फत तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करून मदतकार्य करण्यात आले तसेच पाणी उपसा पंपांचीही व्यवस्था करण्यात आली. भरतीच्या काळात पाणी साचलेल्या बेलापूर ते दिघा येथील विविध ठिकाणांना भेटी देत महापौर सुजाता पाटील यांनी तेथील स्थितीची पाहणी केली व पाणी उपसा पंपांची संख्या वाढवून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी अधिकारी, कर्मचारी दक्षतेने कार्यरत राहतील, असे नागरिकांना आश्वस्त केले.रस्त्यावर पाणी साचते त्या ठिकाणी तातडीने रस्त्याच्या कडेचे चर खोदून व वॉटर एन्ट्री मोकळ्या करून पाणी वाहते करण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश देण्यात आले.

नाल्यांमध्ये कचरा अडकून ते तुंबू नयेत यासाठी दक्षता घेण्याची व अडकलेला कचरा नियमित साफ करण्याची सूचना करण्यात आली. १ जुलैला सकाळी ८.३० ते सायं. ६.३० पर्यंत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १०५.४६ मिमी पावसाची नोंद झाली.

# भाजीपाल्याचे घाऊक दर ३० टक्क्यांनी घसरले

## ग्राहक न आल्याने माल बाजारात पडून

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सलग तीन दिवस सुरू असलेल्या पावसाचा परिणाम आता आशियातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यवहारांवरही दिसू लागला आहे. भाजीपाल्याची आवक नियमित असतानाही ग्राहक आणि किरकोळ विक्रेत्यांचे प्रमाण घटल्याने बुधवारी बाजारातील उठाव मंदावला होता. त्यामुळे अनेक भाज्यांच्या घाऊक दरांत ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घसरण झाली असून, भाजीपालादेखील मोठ्या प्रमाणात बाजारातच असाच पडून राहिला होता.

एपीएमसी भाजी बाजारात बुधवारी सुमारे ५५० वाहनांमधून भाजीपाल्याची आवक झाली. सामान्यतः मध्यरात्रीनंतर दाखल होणारा भाजीपाला सकाळी आठ ते नऊ वाजेपर्यंत शहर व उपनगरातील व्यापाऱ्यांकडून तसेच किरकोळ विक्रेत्यांकडून पूर्णपणे उचलला जातो, मात्र सततच्या पावसामुळे मुंबई, नवी मुंबई आणि उपनगरांतील अनेक भागांत पाणी साचले होते. त्यामुळे किरकोळ विक्रेते आणि ग्राहक बाजारात पोहोचू शकले नाहीत. परिणामी दुपारपर्यंतही मोठ्या प्रमाणात माल विक्रीविना बाजारात पडून होता.

व्यापारी महासंघाचे अध्यक्ष कैलास ताजने यांच्या मते पावसामुळे किरकोळ विक्रेते बाजारात येऊ शकले नाहीत. मागणी घटल्याने घाऊक बाजारातील अनेक भाज्यांचे दर ३० ते ४० टक्क्यांनी कमी झाले.

# उरणला फार्मर कप स्पर्धेचे थेट प्रक्षेपण

## अन्नदाता शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार

**उरण : वार्ताहर**

सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ स्पर्धेचा डिजिटल शुभारंभ २९ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. या राज्यस्तरीय उद्घाटन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात शेतकऱ्यांसाठी दाखवण्यात आले. उरण तालुक्यातील पानी फाउंडेशन अंतर्गत सहभागी झालेल्या जवळपास २५ फार्मर कप गटांनी हा सोहळा पाहिला.

ही स्पर्धा राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक अनोखी स्पर्धा असून शेती क्षेत्रातील प्रगती व शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी तिचे आयोजन करण्यात आले आहे. सामूहिक शेती सहभागाचे महत्त्व, शाश्वत शेती पद्धती, नोंदणी उद्दिष्ट व निकष यांच्या आधारे स्पर्धा राबवली जात आहे. शेतकरी एकत्र येऊन गट तयार करून संघटितपणे शेती करावी, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी शेतकऱ्यांना स्पर्धेची माहिती देण्यात आली व त्यावर चर्चा झाली. कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी आर.टी. नारनवर, कृषी सहाय्यक अधिकारी आदीका पानसरे, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रभाग क्र. ९च्या नगरसेविका प्रतिभा भोईर यांनी टेंभोडे गावातील महिला भगिनींसाठी साईबाबा मंदिर, शिर्डी येथे सहलीचे आयोजन केले होते. या प्रवासादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचाही लाभ महिलावर्गाने घेतला.**

# उरणमध्ये विद्यार्थिनींना मासिक पाळी आरोग्य मार्गदर्शन

## सॅनिटरी नॅपकिनचे वाटप

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण येथील एन.आय. हायस्कूलमध्ये इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था आणि शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या उपक्रमात ९५ विद्यार्थिनींना कॉटनचे सॅनिटरी नॅपकिन मोफत वितरित करण्यात आले.



कार्यक्रमात विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी, योग्य सॅनिटरी नॅपकिनचा वापर तसेच यासंबंधीचे गैरसमज दूर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्यविषयक योग्य माहिती मिळाल्याने विद्यार्थिनींनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमास श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्थेच्या अध्यक्षा समाजसेविका तथा रायगड भूषण संगीता ढेरे, रायगड भूषण उपाध्यक्ष मीनाक्षी कोळी, शीलक्ष्मी सोशल फाउंडेशनच्या अध्यक्ष रजनी ताजणे, हृदया, भैरवी, चौधरी उपस्थित होत्या. तसेच शाळेच्या ज्येष्ठ व माजी शिक्षिका कुमार, शाळेचे मुख्याध्यापक एल.एम. भोये, पर्यवेक्षक भूषण झोपे, पर्यवेक्षिका जगताप, सूत्रसंचालक शिक्षिका दिपाली पाटील, सहाय्यक शिक्षक खरमाटे एस.बी., कवितके उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींनी या उपयुक्त उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचे आरोग्य जनजागृती उपक्रम नियमितपणे आयोजित करण्याची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



# पावसाळा सुरू होताच छत्री कारागीर दुरूस्तीच्या कामात व्यस्त

**उरण : वार्ताहर**

पावसापासून संरक्षण होण्यासाठी छत्री आणि रेनकोटची गरज भासते. पावसाळा सुरू झाला की आठवण येते ती छत्री आणि रेनकोटची. सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू झाल्याने छत्री दुरुस्तीसाठी नागरिकांना कारागिरांकडे धाव घ्यावी लागत आहे. उरण शहरात ठिकठिकाणी छत्री दुरुस्त करणारे कारागीर दिसू लागले आहेत.

राजपाल नाका, बाजारपेठ आदी ठिकाणी छत्री दुरुस्तीची कामे सुरू आहेत. छत्री किमतीने स्वस्त झाल्याने दुरुस्तीसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या कमी झाली आहे. तार लावणे ३० रुपये, छत्रीची मूठ लावणे ५० रुपये तसेच इतर लहान मोठी दुरुस्ती आम्ही करतो, असे छत्री दुरुस्ती करणारे कारागीर दिनेश वाघेला यांनी सांगितले. गेली १५ वर्षांपासून मी हे काम करीत आहे, असेही त्यांनी सांगितले.

# लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पालक-शिक्षक मेळावा घेण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक गावंड, खुटले, पालक प्रतिनिधी नाथबाबा सानप, वैशाली भंडारी उपस्थित होते.



सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील आणि भूमिपुत्रांचे कैवारी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक कोंगेरे यांनी विद्यालयाचा एसएससी परीक्षा निकाल बोर्डाच्या निकालापेक्षा अधिक असून सहा विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे आहेत. तसेच मागील वर्षी एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी चार विद्यार्थ्यांची निवड, आठवी व पाचवी स्कॉलरशिपसाठी दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

रितीन जेना या विद्यार्थ्याची राष्ट्रीय पातळीवर रिले स्पर्धेसाठी निवड झाली होती व निवडीबद्दल त्याला शिष्यवृत्ती मिळाली. तसेच शाळेच्या भौतिक सुविधा व शैक्षणिक बाबींवर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यालयातील गुरुकुल प्रमुख अनिल पाटील यांनी गुरुकुल या संस्थेच्या उपक्रमाबद्दल आणि स्पर्धा परीक्षांबद्दल माहिती सांगितली. सहाणे यांनी शालेय शिस्त व क्रीडा याविषयी माहिती दिली. पेरवी यांनी विविध शालेय उपक्रम आणि एआय या उपक्रमाबद्दल माहिती पालकांना दिली. एस.डी. पाटील यांनी किशोरवयीन मुलींसाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती सांगितली. पालक मनोगतातून राजेंद्र जगताप, वंदना घेरडे यांनी विद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले तसेच विद्यालयाकडून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या आवडीच्या करिअरबद्दल मार्गदर्शन केले जाते. या शाळेच्या उल्लेखनीय कामाचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे निवेदन विद्यालयातील उपशिक्षिका डी.डी. पाटील यांनी केले आणि खुटले यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून पालक मेळाव्याची सांगता केली.

# वाशी प्लाझा येथील दुर्घटनाग्रस्त नाल्याचे काम पूर्णत्वाकडे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी प्लाझा इमारतीलगत महापालिकेच्या नाल्याचा स्लॅब खचल्याने अनेक दुचाकी नाल्यात कोसळल्या होत्या. अखेर एका वर्षानंतर दुर्घटनाग्रस्त नाल्याचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. या कामासाठी सुमारे ५९ लाख रुपये इतका खर्च आला आहे. वाशी सेक्टर १७ येथे वाशी प्लाझा इमारतीलगत महापालिकेचा पावसाळी पाणी वाहून नेणारा नाला आहे.

१६ जून २०२५ रोजी या नाल्याचा स्लॅब खचल्याने आठ दुचाकी नाल्यात कोसळल्या होत्या. त्यानंतर काही महिने प्रशासनाने या ठिकाणी बांबूचे कडे लावले होते. या ठिकाणी नागरिकांची वर्दळ असताना आणखी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. दरम्यान, घटनास्थळापासून जवळच उपाहारगृह व ट्रॅव्हल्स, स्टेशनरी यांची दुकाने आहेत. रात्रीच्या वेळी तिथे कुणीही पडून जीवितहानी होण्याची शक्यता होती.

नवी मुंबईची उभारणी होत असताना सर्वात अगोदर ही इमारत बांधण्यात आली. सिडकोकालीन पावसाळी गटार या इमारतीच्या संरक्षक भिंतीजवळून जात आहे. ही दुर्घटना घडल्यामुळे या गटाराचा काही भाग या इमारतीच्या संरक्षक भिंतीच्या आतील बाजूने असल्याचे उघड झाले आहे. ज्या भागामध्ये भिंत खचली त्या भागावरील गटाराचा स्लॅबदेखील खचून आत पडला आहे. या गटाराच्या स्लॅबवर ही वाहने उभी होती. हेच गटार पुढे वाशी महामार्गाकडे जाणाऱ्या मुख्य मार्गाच्या खालून सेक्टर १ कडे गेले आहे.

या मार्गाखालील गटार खचले असते तर या मार्गावरून जाणारी वाहने एकमेकांवर धडकून दुर्घटना घडली असती. त्यामुळे या गटाराची शहर अभियंता विभागाच्या वतीने पूर्ण पडताळणी करण्यात आली. त्यानंतर दुर्घटनाग्रस्त नाल्याचे आणि भिंतीचे काम हाती घेण्यात आले. सध्या ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.

# रायगड जिल्ह्यात नारळ, सुपारीवर प्रक्रिया करणारे व्यवसाय सुरू करा -आमदार महेंद्र दळवी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा हा शेतीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जात होता. आता या जिल्ह्यात औद्योगिकरण वाढत असल्याने भातशेती कमी होत आहे. त्यामुळे शेतकरी बागायत शेतीकडे वळले आहेत. शेतकऱ्यांसाठी शासन विविध योजना रावबते त्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यात सुपारी व नारळाची लागवडही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे या फळांवर प्रक्रिया करणारे व्यवसाय सुरू केले पाहिजेत, असे प्रतिपादन अलिबाग-मुरूड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी केले.



रायगड जिल्हा परिषद कृषी विभाग, अलिबाग पंचायत समितीच्या वतीने अलिबागमध्ये कृषिदिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि.१) शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार महेंद्र दळवी अध्यक्षस्थानवरून बोलत होते. रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा परिषद सदस्य मानसी दळवी, जिल्हा परिषद सदस्य अनंत गोंधळी, जिल्हा परिषद सदस्य सचिन राऊळ, जिल्हा कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, राजिप माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, अलिबाग पंचायत समिती गटविकास अधिकारी शर्मिला पाटील, उपसभापती प्रिया भगत, तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत, अलिबाग तालुका प्रभारी कृषी अधिकारी राजेश घरत, पंचायत समिती सदस्य तथा गटनेते प्रकाश पाटील, सदस्य शैलेंद्र पाटील, कृष्णा लोभी, स्नेहा रूत, वैशाली कटवटे, प्रियांका गुंजाळ, प्रियदर्शनी पाटील, जयंत वार्डे, शरद गोंधळी, अंकिता घरत, संतोष निगडे, अंजली पाटील, गिरीश तुळपुळे उपस्थित होते. ३० प्रगतशील शेतकऱ्यांचा या मेळाव्यात सन्मान करण्यात आला. यावेळी कृषी पुस्तिका अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी असलेल्या लाभांच्या योजना जिल्हा बँकेने शेतकऱ्यांना पुरवल्या पाहिजेत. परंतु सते होत नाही. त्यांच्याकडून ही कमे करून घ्यायला हवीत तसेच इतर बँकेच्या माध्यमातून देख् शेतकऱ्यांना लाभ मिळेल, यासाठी प्रयत्न करावेत. असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर म्हणाले की, शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करावयाल हवेत.शेतकऱ्यांसाठी राज्य आणि केंद्र सरकारने अनेक योजना राबवल्या आहेत. त्या सर्व योजना या तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी कृषी विभाग प्रयत्न करीत आहे. तरुणांनी शेतीकडे पाठ फिरविली आहे. त्यांना शेतीकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रत्येक शेतकऱ्याचा फार्मर आयडी तयार करणे गरजेचे आहे. यासाठी अधिका-यांनी याबाबत माहिती घेउन शेतकऱ्यांना मदत करावी. असे आवाहन कृषि सभापती वैकुंठ पाटील यांनी केले.

मिशन ऑर्गेनिक भारत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राहूल टोपले यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीचे महत्त्व सांगितले. रासायनिक खतांच्याऐवजी सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.गटविकास अधिकारी शर्मिला पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अजित हरवडे यांनी केले. कृषिविस्तार आधिकारी वसंत दळवी यांनी आभारप्रदर्शन केले.

## बामणोली गावात भाजपच्या माध्यमातून बसले विजेचे पोल

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील बामणोली गावात ग्रामस्थांच्या मागणीनुसार भाजपच्या माध्यमातून पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्यसभेचे माजी खा.धैर्यशील पाटील,जेष्ठ नेते तथा जिल्हा महामंत्री सतिष धारप,माजी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील,राजिपचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या विशेष सहकार्याने विजेचे बारा पोल बसविण्यात आले असून या कामी पक्षाच्या महिला मोर्चा तालुकाध्यक्षा रचना थोरे यांनी पाठपुरावा करून ग्रामस्थांना दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती केली आहे. रचना थोरे यांच्या प्रयत्नांनी बामणोली गावात बारा विजेचे पोल बसवून गावात विजेचा लखलखाट होणार असल्याने ग्रामस्थांनी रचना थोरे व भाजपचे दक्षिण रायगड युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे व भाजप पक्षाचे विशेष ऋण व आभार व्यक्त केले आहेत.

माणगाव पंचायत समितीच्या फेब्रुवारी महिन्यात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या मतदार संघातून फिरत असताना भाजपच्या महिला मोर्चा तालुकाध्यक्षा रचना थोरे यांनी बामणोली ग्रामस्थांना निवडणुकीचा निकाल काहीही लागो मी आपल्या गावातील असणारे प्रश्न,समस्या निश्चितपणे मार्गी लावेन. ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावातील आवश्यक असणारे बारा विजेचे पोल बसवून देण्याचा शब्द त्यावेळी रचना थोरे यांनी बामणोली ग्रामस्थांना दिला होता. त्याची वचनपूर्ती करताना भाजपचे ८० टक्के समाजकरण व फक्त २० टक्के राजकारण या ध्येयाने बहुजन समाजात काम करताना रचना थोरे यांनी बामणोली ग्रामस्थांचा विश्वास सार्थ ठरवून दिलेल्या बारा विजेचे पोल बसविण्याची वचनपूर्ती केली. माणगाव पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत रचना थोरे यांचा निसटता पराभव झाला तरी थोरे यांनी आपली सामाजिक बांधिलकी न सोडता निकालाच्या त्याच दिवसापासून आपल्या समाज कार्याला अधिक गती देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे पती निलेश थोरे हे गेली अनेकवर्ष समाज हिताचे कार्य सातत्याने करीत आहेत. त्यांच्या खांद्याला खांदा लावून रचना थोरे या राजकारणाच्या माध्यमातून समाज हिताचे कार्य करीत आहेत.

## अलिबागमध्ये डॉक्टर्स डे साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनतर्फे (एएमएमए ) आत्मनिर्भर स्पेशल चाईल्ड स्कूल, आरसीएफ कॉलनी, अलिबाग येथे सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रख्यात न्युरोसर्जन डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर यांनी शाळेतील ५० विशेष मुलांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना खाऊ, शालेय साहित्य आणि चॉकलेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी एएमएमए चे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी आत्मनिर्भर स्पेशल चाईल्ड स्कूलच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था अत्यंत समर्पितपणे कार्य करत असून अशा सेवाभावी संस्थांना समाजातील सर्व स्तरांतून सातत्याने सहकार्य व पाठबळ मिळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.या उपक्रमास लायन्स क्लब, अलिबाग यांनीही मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमास एएमएमएचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, सचिव डॉ. अमित बेनकर, खजिनदार डॉ. आदेश मोकल, उपाध्यक्ष डॉ. रेखा म्हात्रे व डॉ. सोनाली नाईक, सहसचिव डॉ. समीर धामणकर, सहखजिनदार डॉ. निशिकांत ठोंबरे, क्रीडा सचिव डॉ. भूषण शेळके, सांस्कृतिक सचिव डॉ. अमोल ठाकूर व डॉ. भाग्यश्री धातावकर, आयोजन सचिव डॉ. अमृता गावळी व डॉ. रश्मी गंभीर, तसेच माजी अध्यक्ष डॉ. वैभव भगत, डॉ. संदेश पाटील, डॉ. अर्चना पाटील, डॉ. अमर पाटील, डॉ. वैजेश पाटील, डॉ. अमेय केळकर आणि अन्य सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था, डॉक्टर, सदस्य व स्वयंसेवकांचे एएमएमए तर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

## 'सूर्यघर सोलर योजना काळाची गरज, एसबीआय सर्वतोपरी मदत करणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्टेट बँक यांच्या वतीने बुधवारी ( दि. १) पेझारी येथील हॉटेल साई वाटिका येथे एसबीआय बँक दिवसाच्या निमित्ताने, सूर्य घर सोलर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्राहकांना सौर ऊर्जेबाबत उपस्थित तज्ज्ञांनी पोयनाड विभागातील नागरिकांना मार्गदर्शन केले.




यावेळी एसबीआय रायगड विभागाचे सहाय्यक महाप्रबंधक अमित कुमार यांनी मेळाव्यासाठी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करतांना सांगितले कि,सूर्य घर सोलर योजना आता काळाची गरज असून नागरिकांनी ह्या योजनेचा लाभ घेतला पाहिजे त्यासाठी भारतीय स्टेट बँक आपल्याला सर्वोतोपरी मदत करणार आहे. ग्राहकांच्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अतिशय मुबलक दरात कर्ज एसबीआय आपल्याला पलब्ध करून देणार आहे.ग्राहकांच्या गरजे व मागणी नुसार,अगदी दोन लाखांपासून ते सहा लाख रुपयांचे कर्ज उपलब्ध असणार असल्याचे अमित कुमार यांनी सांगितले.

एसबीआयचे जनरल मॅनेजर (क्रेडिट विभाग पेण रायगड) स्वप्नील तांबोळी यांनी सूर्य घर योजनेचे असणारे सर्व फायदे उपस्थित नागरिकांना सांगितले त्यात प्रामुख्याने वीज बिलात होणारी मोठी बचत,शासनाकडून मिळणारे अनुदान, पर्यावरण पूरक ऊर्जा,कमी व्याज दरात मिळणारे कर्ज सुविधा, दीर्घकालीन आर्थिक लाभ ग्राहकांना होणार असल्याचे सांगितले.सदरच्या मेळाव्यात महावितरणचे कार्यकारी अभियंता राजन भगत यांनी ग्राहकांना सोलर पॅनेल बसवण्याच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती आणि सुलभ वित्तपुरवठ्या विषयी (सोलर लोन) याविषयी मार्गदर्शन केले.पोयनाड विभागातील नागरिकांनी सूर्य ऊर्जेचा स्मार्ट वापर सुरक्षित भविष्याचा आधार या संकल्पने विषयी संपूर्ण माहिती त्यांनी दिली.एसबीआय पोयनाड विभागाचे शाखा व्यवस्थापक सावन सपकाळे यांनीसूर्य घर सोलर योजनेला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने आकर्षक कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून विभागातील नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.ह्या मेळाव्यासाठी विश्वसनीय सोलर प्रदात्यांनी उपस्थिती राहून मार्गदर्शन केले.

योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांना विशेष सूट मिळणार असल्याचे सांगण्यात आले. सूर्य घर सोलर मेळाव्यासाठी एसबीआय रायगड विभागाचे सहाय्यक महाप्रबंधक अमित कुमार, मुख्य प्रबंधक (क्रेडिट विभाग)स्वप्नील तांबोळी, एसबीआय अधिकारी निरुकुमारी,पोयनाड शाखेचे व्यवस्थापक सावन सपकाळे,आशिष जगे,अमित दोंडे,मंगेश बिरादार महावितरण चे कार्यकारी अभियंता राजेश भगत, उपकार्यकारी अभियंता नमित नाईक,संदेश कदम,रुपेश नागावकर उपस्थित होते.

## नवघर शाळेत अनोख्या पद्धतीने वृक्ष वाढदिवस; झाडांचे औक्षण, केक कटिंग, चॉकलेट वाटप

**पाली : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज ओळखून,१ जुलै रोजी कृषिदिनाचे अतिशय अनोखे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवघर येथे 'वृक्षदिन' आणि 'वृक्ष वाढदिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नेहमीपेक्षा वेगळा आणि पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या या उपक्रमाची सध्या सर्वत्र कौतुकास्पद चर्चा होत आहे.



शाळेतील विद्यार्थ्यांनी आज केवळ नवीन झाडे लावली नाहीत, तर मागील वर्षात लावलेल्या आणि अत्यंत प्रेमाने जोपासलेल्या झाडांचा चक्क 'वाढदिवस' साजरा केला. मुलांनी या झाडांना पारंपरिक पद्धतीने ओवाळून (औक्षण करून), केक कापून आणि एकमेकांना चॉकलेट वाटून हा आनंद साजरा केला. या आगळ्यावेगळ्या वाढदिवसामुळे विद्यार्थ्यांमध्ये झाडांविषयी कमालीची आपुलकी आणि कृतज्ञतेची भावना पाहायला मिळाली.

आजच्या या विशेष दिवसाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर मॅडम यांचाही आज वाढदिवस होता. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांनी स्वतः शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले आणि सर्व विद्यार्थ्यांना 'वृक्ष संवर्धन' व निसर्ग रक्षणाचा मोलाचा संदेश दिला. रिमझिम बरसणाऱ्या पावसाच्या सरीत हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी शाळेतील विषय शिक्षिका वृषाली गुरव, उपशिक्षक शीतल पाटील, रुपाली लेंडवे आणि उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी उपस्थित राहून कृषिदिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून, त्यांचे संगोपन करणे किती गरजेचे आहे आणि म्हणूनच हा 'वृक्ष वाढदिवस' का साजरा केला जात आहे, हे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले.हयावेळी केंद्रप्रमुख परीक्षेत निवड झालेल्या शीतल पाटील यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून पर्यावरण रक्षणाचा अनोखा संदेश दिला.

## 'केंद्रासह राज्य शासनाच्या योजनांचा फायदा सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा'

**पेण : प्रतिनिधी**

केंद्र शासनाने प्रधानमंत्री पीएमस्वनिधी महिला बचतगटांसह पथ विक्रेत्यांसाठी आणली असून याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना व्हावी हा दृष्टिकोन या मेळाव्यानिमित्त ठेवला असल्याने पेण शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी केंद्रासह राज्य शासनाच्या योजनांचा फायदा घ्यावा असे आवाहन पेण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी केले आहे.



पेण नगरपालिकेच्या माध्यमातून पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत लोककल्याण मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्याला नगराध्यक्षा प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, सभापती आनंद जाधव, आफ्रीन आखवारे, कलावती पाटील, सुनिता जोशी नगरसेविका वसुधा पाटील, पल्लवी कालेकर सुशीला ठाकूर संगीता लाड सुजाता डाकी जास्विन पाटील , नगरसेवक नीलकंठ म्हात्रे मितेश शहा ,अभिराज कडू यासह नगरपालिका अधिकारी विश्वनाथ गायकवाड आदिंसह सर्व नगरसेवक, कर्मचारी, बचत गटातील महिला पथविक्रेते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नगराध्यक्षा प्रितम पाटील म्हणाल्या की देशाचे पतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासनाने अनेक योजना गोरगरीब जनतेच्या हिताकरीता आणल्या आहेत त्यामुळे त्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहचून त्यांना त्याचा लाभ मिळावा हा उद्देश आम्ही डोळ्यासमोर या कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. पेण शहराच्या प्रत्येक घटकातील लोकांना या योजनेचां लाभ मिळावा तसेच येथील नागरिकांना काही अडचणी येत असतील तर त्यांनी संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क साधून या योजनांचा लाभ घ्यावा .पेण शहरातील प्रत्येक नागरिकांना पेण नगरपरिषदेत येऊन शासनाने ज्या योजना आणल्या आहेत त्या समजून घ्या.

## 'अमृत'ची हरित ऊर्जा क्षेत्राकडे वाटचाल; राज्यभरात ईव्ही चार्जिंग स्टेशन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'Go Green India' आणि 'Sustainable Mobility' या संकल्पनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या माध्यमातून राज्यभरात 'अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन' व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे.

देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर झपाट्याने वाढत असून त्यानुसार ईव्ही चार्जिंग स्टेशनचे विस्तृत जाळे उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पेट्रोल पंपांप्रमाणे राज्यातील विविध भागांत ईव्ही चार्जिंग स्टेशनची मागणी वाढत असून या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. राज्यातील युवकांनी या संधींचा लाभ घ्यावा, या उद्देशाने अमृतने हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

या उपक्रमाअंतर्गत ईव्ही चार्जिंग स्टेशनची उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही संबंधित तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल व्यवसाय तसेच ग्रामीण भागात चार्जिंग हब उभारणी अशा विविध क्षेत्रांत व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात ईव्ही क्षेत्र हे सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या उद्योगांपैकी एक ठरणार असल्याने प्रशिक्षित उद्योजकांना मोठा लाभ मिळणार आहे.

या उपक्रमात सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बाजारपेठेचा अभ्यास तसेच व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. याशिवाय, अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभही पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाचा लाभ युवक-युवती, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई उद्योजक, शेतकरी उत्पादक गट, ग्रामीण उद्योजक तसेच स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणारे नागरिक घेऊ शकतात. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी अमृतच्या लक्षित गटासाठी निर्धारित पात्रता व अटी लागू राहतील.

ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायाबरोबरच ऊर्जा व्यवस्थापन, चार्जिंग नेटवर्क ऑपरेशन, इलेक्ट्रिकल देखभाल, ग्रीन एनर्जी प्रकल्प, ईव्ही उपकरण विक्री व सेवा तसेच उद्योजकता विकास या क्षेत्रांमध्येही रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. ग्रामीण भागातील युवकांसाठी हा व्यवसाय उत्पन्नाचे प्रभावी साधन ठरू शकतो.

इच्छुक उमेदवारांनी अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन 'योजना' विभागातील 'विशेष योजना EV Charging Station Partner' या पर्यायातून ऑनलाइन अर्ज करावा.

## माथेरानमध्ये अन्न व औषध प्रशासनाकडून जनजागृती

**माथेरान : बातमीदार**

राज्यात अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवाई बरोबरच जनजागृती मोहीम देखील राबविण्यात येत असून,अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान मध्ये विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमात माथेरान मधील लहान मोठे व्यापारी,रेस्टॉरंट व हॉटेलधारकांना अन्न सुरक्षा नियमांची सविस्तर माहिती देण्यात आली.या कार्यक्रमात फूड सेफ्टी विभागाचे प्रशांत शिंदे व विशाल ईघारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.अन्न परवाना अनिवार्य असून स्वयंपाकघरातील स्वच्छता, नियमित पेस्ट कंट्रोल,कामगारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र, पाण्याची चाचणी अहवाल तसेच अन्न पदार्थांच्या गुणवत्तेची तपासणी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

ग्राहकांना अन्न देताना हातमोजे व रबर टोपी वापरणे बंधनकारक असून सकस अन्न पुरविणे ही व्यावसायिकांची जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले.किराणा दुकानदारांनाही परवाना घेणे अनिवार्य असून खरेदी बिल जतन करणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले.

# भारत-इंग्लंड सामन्यात 'पावसाची बॅटिंग'

## पहिली टी-२० लढत रद्द; अभिषेक शर्मा नवा 'षटकार किंग'

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिली टी-२० लढत अनिर्णित राहिली. पावसामुळे इंग्लंडचा डाव सुरू होऊ शकला नाही आणि अखेरीस सामना रद्द करावा लागला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यादरम्यान अभिषेकने एक नवा विक्रम आपल्या नावावर केला. पावसामुळे सामना पुन्हा सुरू होऊ न शकल्याने तो रद्द करावा लागला.




तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताची सुरुवात चांगली झाली नाही आणि दुसऱ्याच षटकात संजू सॅमसन व इशान किशन यांच्या विकेट्स गमावल्या. सॅमसनला साकिब महमूदने बाद केले, तर इशान धावबाद (रन-आउट) होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर अभिषेकने कर्णधार श्रेयस अय्यरच्या साथीने डाव सावरला. अभिषेक आणि श्रेयस यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने २० षटकांत ७ बाद १८९ धावा केल्या. भारताचा डाव संपत असतानाच पावसाला सुरुवात झाली; तर इंग्लंडचा डाव सुरू होण्यापूर्वीच पावसाचा जोर वाढला. अखेर पावसामुळे सामना पुन्हा सुरू होऊ शकला नाही.

या सामन्यादरम्यान अभिषेकने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला; टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (पूर्ण सदस्य देशांच्या खेळाडूंमध्ये) सर्वात कमी चेंडूंत १०० षटकार पूर्ण करणारा खेळाडू म्हणून त्याने विक्रम नोंदवला. अभिषेकने वेस्ट इंडिजचा एव्हिन लुईस आणि न्यूझीलंडचा फिन अ‍ॅलन यांसारख्या दिग्गज फलंदाजांना मागे टाकले. त्याने अवघ्या ७८५ चेंडूंमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० षटकारांचा टप्पा गाठला. या प्रकारात इतक्या कमी चेंडूंमध्ये ही कामगिरी करणारा तो पहिलाच फलंदाज ठरला.

भारतासाठी श्रेयसने ४७ चेंडूंत ६८ धावा केल्या, ज्यामध्ये सहा चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. त्याचवेळी अभिषेकने २४ चेंडूंत ५९ धावांची खेळी केली, ज्यात सहा चौकार आणि चार षटकार मारले गेले. त्यांच्याव्यतिरिक्त शिवम दुबे २१ चेंडूंत ४२ धावांवर नाबाद राहिला. त्याने दोन चौकार आणि तीन षटकार लगावले.

### वैभवला पदार्पणाची प्रतीक्षा कायम

या सामन्यातही भारताने १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला पदार्पणाची संधी दिली नाही. आयर्लंडविरुद्धची मालिका ०-२ने गमावल्यानंतर वैभवला संधी मिळेल अशी चर्चा होती, परंतु श्रेयस अय्यरने मुख्य संघावरच विश्वास कायम ठेवला. आयर्लंडविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात पदार्पण करणारे वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव आणि सूर्यांश शेडगे यांना या सामन्यात संधी मिळाली नाही. भारताने 'प्लेइंग इलेव्हन'मध्ये अक्षर पटेल, रवी बिश्नोई व वरुण चक्रवर्ती या तीन फिरकी गोलंदाजांचा समावेश केला होता.

# बेल्जियमचा सेनेगलवर थरारक विजय

**सिएटल : वृत्तसंस्था**



फिफा विश्वचषक स्पर्धेत बेल्जियमने सेनेगलविरुद्ध अविश्वसनीय पुनरागमन करत ३-२ असा विजय मिळवला. दोन गोलांनी पिछाडीवर असतानाही सामन्याच्या शेवटच्या क्षणी आणि अतिरिक्त वेळेत गोल करत बेल्जियमने दिलेला हा विजय विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठ्या पुनरागमनांपैकी एक मानला जात आहे.

सामन्याची ८५ मिनिटे उलटले होते आणि सेनेगल २-०ने आघाडीवर होते. हबीब दियारा आणि इस्माईला सार (ज्याने विश्वचषकातील आपला चौथा गोल नोंदवला) यांनी केलेल्या गोलमुळे सेनेगल विजयाचे स्वप्न पाहत होते, मात्र शेवटच्या पाच मिनिटांत बेल्जियमने सामन्याचे पारडे पूर्णपणे फिरवले. युरी टिलेमन्सने सामन्याच्या १२५व्या मिनिटाला पेनल्टीवर निर्णायक गोल करून बेल्जियमला ३-२ असा ऐतिहासिक विजय मिळवून दिला. हा विश्वचषक इतिहासातील सर्वात उशिरा झालेला गोल ठरला.

या विजयानंतर बेल्जियम आता सोमवारी सिएटल येथे होणाऱ्या सामन्यात अमेरिकेच्या संघाशी भिडणार आहे. २०१४मध्ये उपांत्यपूर्व फेरी आणि २०१८मध्ये उपांत्य फेरी गाठल्यानंतर बेल्जियमला पुन्हा एकदा विश्वचषकाच्या अंतिम टप्प्यात पोहचण्याची मोठी संधी आहे.

# श्रेयस अय्यरची ऐतिहासिक कामगिरी!

## इंग्लंडमध्ये अर्धशतक करणारा पहिला भारतीय कर्णधार




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला, मात्र, या सामन्यात भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. इंग्लंडच्या भूमीवर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अर्धशतक झळकावणारा तो पहिलाच भारतीय कर्णधार ठरला.

या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अभिषेक शर्मा आणि श्रेयस अय्यर यांच्या दमदार अर्धशतकांच्या जोरावर भारताने २० षटकांत ७ बाद १८९ धावा उभारल्या. त्यानंतर सततच्या पावसामुळे सामना रद्द करण्यात आला. इंग्लंडला फलंदाजीची संधीच मिळाली नाही.

या सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करायला आलेल्या श्रेयस अय्यरने संयम राखत ४७ चेंडूंत ६८ धावांची खेळी केली. त्याने १४४च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करत सहा चौकार आणि एक षटकार लगावला. लियाम डॉसनच्या गोलंदाजीवर एक धाव घेत त्याने आपले नववे टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक पूर्ण केले. यासह त्याने एका नव्या विक्रमाला गवसणी दिली.

यापूर्वी इंग्लंडमध्ये भारतीय कर्णधार म्हणून टी-२० क्रिकेटमध्ये सर्वोच्च धावसंख्या विराट कोहलीच्या (४७ धावा) नावावर होती. आता श्रेयसने ६८ धावांची खेळी करत विराटला मागे टाकले आहे. विशेष म्हणजे विराट आणि रोहित शर्मालाही इंग्लंडमध्ये कर्णधार म्हणून टी-२० सामन्यात अर्धशतक करता आले नव्हते.

# इंग्लंडची 'राऊंड १६'मध्ये धडक

## काँगो डीआरचा प्रवास अखेर संपुष्टात

**अ‍ॅटलांटा : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेतील अटीतटीच्या बाद फेरीच्या सामन्यात इंग्लंडने डीआर काँगोचा २-१ने पराभव करत दिमाखात उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. अटलांटा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात कर्णधार हॅरी केनने अवघ्या ११ मिनिटांत दोन गोल करून इंग्लंडला थरारक विजय मिळवून दिला.



पूर्वार्धात ७व्या मिनिटालाच डीआर काँगोच्या ब्रायन सिपेन्गाने मैदानावर खळबळ उडवून दिली. इंग्लंडची बचावात्मक चूक हेरून सिपेन्गाने गोलपोस्टच्या अगदी जवळून एक सणसणीत लो-शॉट मारत गोलरक्षक जॉर्डन पिकफोर्डला चकवले आणि काँगोला १-० अशी अनपेक्षित आघाडी मिळवून दिली. या धक्क्यानंतर इंग्लंडने आक्रमणाची धार वाढवली. ज्युड बेलिंगहॅम आणि नोनी माडुएके यांनी गोल करण्याचे उत्तम प्रयत्न केले, मात्र काँगोचा गोलरक्षक लायोनेल म्पासी भिंतीसारखा उभा राहिला. पुढे दुसऱ्या हाफमध्येही तब्बल ७० मिनिटांपर्यंत काँगोने इंग्लंडला रोखून धरले होते.

सामन्यात केवळ १५ मिनिटे शिल्लक असताना बदली खेळाडू अँथनी गॉर्डनने डाव्या बाजूने बॉक्समध्ये एक उत्कृष्ट क्रॉस टाकला. तिथे योग्य ठिकाणी उपस्थित असलेल्या हॅरी केनने शानदार हेडर मारून चेंडू गोलपोस्टमध्ये धाडला आणि इंग्लंडला १-१ अशी अत्यंत महत्त्वाची बरोबरी साधून दिली.

पहिल्या गोलनंतर अवघ्या ११ मिनिटांनी हॅरी केनने पुन्हा एकदा आपली जादू दाखवली. काँगोच्या डी-बॉक्सच्या काठावर डिफेंडर्सनी त्याला घेरलेले असतानाही ज्युड बेलिंगहॅम आणि गॉर्डनच्या पासवर केनने अप्रतिम गतीने वळत गोलपोस्टच्या उजव्या कोपऱ्यात एक रॉकेट शॉट मारला. म्पासीकडे हा शॉट रोखण्यासाठी कोणतीही संधी नव्हती. या दुसऱ्या गोलसह इंग्लंडने २-१ अशी विजयी आघाडी घेतली. हाच गोलफरक शेवटपर्यंत कायम राहिला.

### हॅरी केनचा नवा विक्रम

या दोन गोलसह हॅरी केनने आंतरराष्ट्रीय मोठ्या स्पर्धांमध्ये (विश्वचषक आणि युरो कप) इंग्लंडसाठी एकूण १९ गोल पूर्ण केले आहेत. युरोपियन पुरुष फुटबॉलपटूंमध्ये आता केवळ ख्रिस्तियानो रोनाल्डो (२४ गोल) त्याच्या पुढे आहे. दुसरीकडे केनने ब्राझीलचे महान फुटबॉलपटू पेले यांचा विश्वचषकातील १२ गोलांचा विक्रम येथे मागे टाकला. केनचे आता विश्वचषकात एकूण १३ गोल्स झाले आहेत. त्याने यापूर्वी गॅरी लिनेकरचा इंग्लंडतर्फे १० गोलचा विक्रमही मागे टाकला होता.

# एम्बाप्पेने नाझारियोसह क्लोझेचा विक्रम मोडला



**न्यू जर्सी : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपच्या राऊंड ऑफ ३२ सामन्यात फ्रान्सने स्वीडनवर ३-० असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या सामन्यात फ्रान्सचा स्टार फुटबॉलपटू किलियन एम्बाप्पेने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर दोन मोठ्या विश्वविक्रमांना गवसणी घातली आहे. त्याने ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू रोनाल्डो नाझारियोसह जर्मनीचा दिग्गज स्ट्रायकर मिरोस्लाव क्लोझेचा विक्रम मोडीत काढला.

दोन गोलांमुळे विश्वचषक इतिहासातील एम्बाप्पेच्या गोलची संख्या आता १८वर पोहचली आहे. यासह एम्बाप्पेने जर्मनीचा दिग्गज स्ट्रायकर मिरोस्लाव क्लोझेचा विक्रम मागे टाकत विश्वचषक इतिहासातील सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसरे स्थान पटकावले. आता तो अर्जेंटिनाचा खेळाडू लिओनेल मेस्सीच्या मोठ्या विक्रमापासून एक गोल दूर आहे.

स्वीडनविरुद्धच्या या सामन्यातील पहिल्या गोलासह एम्बाप्पेने विश्वचषकातील नॉकआऊट सामन्यांमध्ये १० गोलांचा टप्पा गाठला. यासह त्याने पोर्तुगालचा महान फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोचा विक्रम मोडीत काढत विश्वचषकाच्या नॉकआऊट फेरीत सर्वाधिक गोल करणारा खेळाडू होण्याचा मान मिळवला.

या सामन्यानंतर विश्वचषकातील एम्बाप्पेचे एकूण २२ गोल झाले आहेत. त्यामध्ये १८ गोल आणि चार असिस्टचा समावेश आहे. या कामगिरीसह तो विश्वचषक इतिहासात सर्वाधिक गोल योगदान देणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. या यादीत लिओनेल मेस्सी २७ गोल योगदानांसह अव्वल स्थानावर आहे.

सध्याच्या विश्वचषक स्पर्धेत एम्बाप्पेने आतापर्यंत सहा गोल केले असून तो गोलसंख्येत मेस्सीच्या बरोबरीवर आहे, मात्र त्याने दोन असिस्टही दिल्यामुळे एकूण गोल योगदानाच्या बाबतीत तो मेस्सीपेक्षा पुढे गेला आहे. त्यामुळे गोल्डन बूटच्या शर्यतीतही एम्बाप्पेने आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.

# इशान किशनची धोनीशी बरोबरी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा युवा फलंदाज इशान किशन आयसीसी टी-२० फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे. २७ वर्षीय इशानने भारताच्याच अभिषेक शर्माला मागे टाकले आहे. नंबर १ स्थानी पोहचताच इशानच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.

इशान किशन हा आयसीसीच्या रँकिंगमध्ये अव्वल स्थानी पोहचणारा दुसराच भारतीय यष्टीरक्षक बनला आहे. याआधी महेंद्रसिंह धोनीने २००६मध्ये आयसीसीच्या वनडे रँकिंगमध्ये नंबर १ स्थानी कब्जा केला होता. आता इशान अशी कामगिरी करणारा दुसराच भारतीय यष्टीरक्षक बनला आहे.

# अमेरिका बाद फेरीत दाखल

**सँटा केरा : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत अमेरिकेने १० खेळाडूंसह शानदार खेळ करत बोस्निया आणि हर्झेगोविना संघाचा २-० असा पराभव केला. या विजयासह अमेरिकेने बाद फेरीत (राऊंड ऑफ १६) धडक मारली असून आता त्यांचा सामना बेल्जियम संघाशी होणार आहे.



सुरुवातीपासूनच अमेरिकेने सामन्यावर वर्चस्व राखत बोस्नियावर दबाव कायम ठेवला. सामन्याच्या पहिल्या सत्रात फोलारिन बालोगुन याने शानदार गोल करत अमेरिकेला आघाडी मिळवून दिली, मात्र ६४व्या मिनिटाला अमेरिकेला मोठा धक्का बसला. तारिक मुहरेमोव्हिच याच्यावरील कठोर टॅकलप्रकरणी पंचांनी फोलारिन बालोगुनला लाल कार्ड दाखवले. त्यामुळे अमेरिका उर्वरित सामना केवळ १० खेळाडूंसह खेळली.

एक खेळाडू कमी असूनही अमेरिकेचा आत्मविश्वास डळमळला नाही. मलिक टिलमन याने दंडक्षेत्राबाहेरून मिळालेल्या मुक्त फटक्याच्या संधीचे सोने करत अप्रतिम गोल केला. चेंडू बोस्नियाचा गोलरक्षक निकोला वासिल्ज यांच्या हाताला स्पर्श करून जाळ्यात विसावला आणि अमेरिकेचा विजय निश्चित झाला.

# राम गोपाल कोठारींनी व्होल्केनो मॅरेथॉन केली पूर्ण

**नवी दिल्ली :** कोलकात्याचे उद्योजक आणि धावपटू राम गोपाल कोठारी यांनी जागतिक क्रीडा क्षेत्रात भारताच्या नावे नवा विक्रम नोंदवला आहे. चिली येथील ईस्टर आयलंड (रापा नुई) येथे पार पडलेली प्रतिष्ठेची व्होल्केनो मॅरेथॉन पूर्ण करणारे ते पहिले भारतीय ठरले आहेत.

४२.१९५ किमी अंतराची ही मॅरेथॉन रनबक या आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे आयोजिण्यात आली होती. या स्पर्धेत विविध देशांतील २० धावपटूंनी सहभाग घेतला. कोठारी यांनी ५ तास ५ मिनिटे आणि ८ सेकंदात ही शर्यत पूर्ण करत एकूण सातवा क्रमांक मिळवला. गेल्या वर्षी भौगोलिक उत्तर ध्रुवावर पूर्ण मॅरेथॉन धावणारे पहिले भारतीय होण्याचा मानही कोठारी यांनीच पटकावला होता.

# 'रेड कार्ड'मुळे डॉमिनोजचा पिझ्झा फ्री!



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील केवळ खेळाचा थरारच नाही, तर एका खेळाडूला मिळालेले 'रेड कार्ड' आता चाहत्यांसाठी मोठी पर्वणी घेऊन आले आहे. अमेरिकेचा खेळाडू फोलोरिन बालोगन याला मिळालेल्या लाल कार्डमुळे डॉमिनोज पिझ्झा कंपनीने तब्बल १० लाख डॉलर्स (सुमारे नऊ कोटी ५१ लाख रुपये) किमतीचे पिझ्झा मोफत वाटण्याची घोषणा केली आहे.

१ जुलै २०२६ रोजी फिफा वर्ल्ड कपच्या 'राउंड ऑफ ३२'मध्ये अमेरिका आणि बोस्निया-हर्झेगोविना यांच्यात चुरशीची लढत झाली. या सामन्याच्या ६४व्या मिनिटाला अमेरिकेचा स्टार स्ट्रायकर फोलोरिन बालोगन याला पंचांनी रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर काढले. बोस्नियाच्या तारिक मुहरेमोविचविरुद्ध केलेल्या एका आव्हानानंतर व्हीएआर तपासणी करून हा निर्णय देण्यात आला होता.

डॉमिनोजने या वर्ल्डकपदरम्यान 'इमर्जन्सी पिझ्झा' नावाची विशेष मार्केटिंग मोहीम सुरू केली होती. या मोहिमेंतर्गत अमेरिकन संघाच्या कोणत्याही खेळाडूला स्पर्धेत 'रेड कार्ड' मिळाल्यास चाहत्यांना मोफत पिझ्झा दिला जाईल, असे वचन कंपनीने दिले होते. बालोगनच्या रेड कार्डनंतर कंपनीने आपले हे वचन पूर्ण करत ही मोठी ऑफर जाहीर केली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com